महामंडळाची वाहने व इतर मालमत्ता यांचे झालेले नुकसान व हानी या कारणास्तव बाहेरील व्यक्ती/संस्था यांच्या विरूध्द महामंडळाने एकूण सुमारे ₹ १७.६३ कोटी रकमेचे ७६० दावे दाखल केलेले आहेत. अशा प्रकारे दावा केलेल्या रकमा प्रत्यक्ष मिळाल्यावर हिशोबात दाखविण्यात येतात. या ७६० प्रकरणांपैकी ४३८ दाव्या प्रकरणातं महामंडळाने ₹ ११.६२ कोटी इतक्या रकमेची मागणी करणारे दावे न्यायालयात दाखल केले आहेत.

## ८) दिनांक ३१-०३-२०१९ पर्यन्त महामंडळाविरूध्द त्रयस्थ पक्षांनी दाखल केलेले दावे :

महामंडळाविरूध्द अपघात इत्यादींबाबत ₹ ३९७.७८ कोटी इतक्या रकमेचे ३४९४ दावे दाखल करण्यांत आलेले आहेत. त्यापैकी ३२६८ दावेचे रू. ३८१.५९ कोटी इतक्या रकमेचे दायित्व अपघात संबंधीत आहे.

## ९) बसगाड्यांचा साठा :-

दिनांक ३१-०३-२०१९ रोजी महामंडळाकडे एकूण १८६२६ प्रवासी वाहने आहेत.तसेच सुमारे ₹ ७५.८६ कोटी रकमेची ६३२ वाहने मोडीत काढलेली असुन विकलेली नाही. त्याचा दिनांक ३१.०३.२०१९ च्या स्थूल रकमेत आणि वाहनांच्या घसारा निधीत समावेश आहे.

**९ (अ) खाते वाहन :** सुमारे ₹ ०.८९ कोटी रकमेची ४० वाहने मोडीत काढलेली असुन विकलेली नाही. त्यांचा दिनांक ३१.०३.२०१९ च्या खाते वाहनाच्या स्थूल रकमेत आणि खाते वाहनांच्या घसारा निधीत समावेश आहे.

## १०) प्रवाशांना दिलेल्या विविध प्रकारच्या सवलतींची प्रतिपूर्ती :-

महामंडळाने विविध स्वरूपात प्रवास भाडयात दिलेल्या सवलतीचे मूल्य ₹ १६२०.५९ कोटी इतके असून ते राज्य शासनास देय असणाऱ्या प्रवासी कराच्या रकमेपोटी समायोजित केले आहे. आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रवासी कर ₹ ४२२.०१ कोटी सवलतींच्या मूल्यांमधुन समायोजित करण्यात आलेले आहे.

## ११) संपादित जमिनीसाठी दायित्वाची तरतूद :-

जमीन खात्याच्या ₹ ९९.६१ कोटी रकमेमध्ये भूसंपादन अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या ₹ ४२.९२ कोटी या अग्रिम रकमेचा समावेश, सदर जमिनी दि.३१.०३.२०१९ पर्यन्त महामंडळाच्या ताब्यात असल्यामुळे, करण्यात आलेला आहे. सध्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ४४ जागांसाठी ५६४५३ चौ. मीटर क्षेत्र अतिक्रमणेखाली आहे.

राज्यातील निरनिराळया ठिकाणी महामंडळाची भुसंपादनाची जमीन मालकांच्या वाढीव नुकसान भरपाईच्या मागण्या, महामंडळाच्या मालकीच्या रिक्त जमिनीवरील अतिक्रमणे, संबंधीत प्राधिकरणास जादा/वादग्रस्त जमिनी परत देण्याची विनंती आणि अगोदरच जमा

केलेली भरपाईची रक्कम परत करण्याच्या मागण्या इत्यादी प्रकरणे वादग्रस्त आहेत. अशा सर्व वादग्रस्त प्रकरणामध्ये योग्य ती न्यायालयीन कारवाई महामंडळाचे हित जपण्यासाठी करण्यात येत आहे.

### १२) मुदत संपलेल्या मुदत ठेवी :-

मुदत संपली असून सुध्दा ₹ ३.१५ कोटी इतक्या रकमेच्या ठेवींची ठेवीदारांकडून ३१ मार्च २०१९ पर्यन्त मागणी झालेली नाही. या मुदत ठेवींवर व्याजाची तरतूद लेख्यात केलेली नाही. कारण अशा मुदत संपलेल्या ठेवींवर महामंडळ व्याज देत नाही.

### १३) भंगार सामुग्रीच्या मालाचा साठा :-

दिनांक ३१.०३.२०१९ रोजी महामंडळाकडे भंगार सामुग्री मालाचा साठा ₹ ०७.९१ कोटी इतक्या किंमतीचा होता

### १४) एम.आय.डी.सी. व सिडकोकडून संपादित केलेल्या जमिनी

महामंडळाने एम.आय.डी.सी. व सिडकोकडून दीर्घ कालावधीकरीता जमिनी भाडे तत्वावर घेतलेल्या असून त्यापैकी काही ताब्यात घेतल्यापासून रिक्त आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जागा | क्षेत्रफळ (हेक्टर) | अधिमूल्य (₹) |
|---|---|---|---|
| १) | चिंचोली-सोलापूर | ९.७८ | २९,३४,००० |
| २) | वाशी-नवी मुंबई | १.५० | ८२,९१,२६८ |

चिंचोली-सोलापूर येथील जागेबाबत ₹ १.२९ कोटी अतिरिक्त अधिमुल्याची एम.आय.डी.सी. कडून मागणी आलेली आहे. तथापि, महामंडळाने सदर बाबत सूट मिळणेविषयी विनंती केलेली आहे.

### १५) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ :-

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व संकीर्ण तरतुदी अधिनियम, १९५२ मधील तरतुदीनुसार रा.प. महामंडळाने भविष्य निर्वाह निधी वर्गणी व महामंडळाचे अंशदान यासाठी स्वतंत्र न्याय व विश्वस्त मंडळाची स्थापना केलेली आहे. केंद्र सरकारने वेळोवेळी गुंतवणुकीसाठी विहीत केलेल्या निदेशाप्रमाणे विश्वस्त मंडळाकडे जमा होणाऱ्या निधीची गुंतवणूक केली जाते.

सांविधिक व्याजदर देण्यासाठी सदर निधीमध्ये तूट निर्माण झाल्यास विश्वस्त मंडळाकडे रक्कम भरपाई करण्याची जबाबदारी महामंडळाने स्विकारलेली आहे.

१. "युपीसीएसएमएफएल" (भविष्य निर्वाह निधी आणि भविष्य निर्वाह निधी - II विश्वस्तनिधी दोघांची गुंतवणुक आहे) यांचेकडुन येणे रकमेपोटी मुंबई उच्चन्यालयात दावा दाखल करण्यात आला असुन याबाबतचे दाव्यांबाबत अधिकृत निवारकाकडुन कार्यवाही चालु आहे. दाव्यामध्ये सामाविष्ट असलेली रक्कम ₹ १७.९१ कोटी (मुदल + व्याज) इतकी आहे.

२. दाव्यामध्ये सामाविष्ट असलेली रक्कम ₹ २७.१६ कोटी (मुदल + व्याज) इतकी मे ॲमटेक ऑटो लि. यांच्याकडून रक्कम प्रलंबित आहे. मे ॲमटेक ऑटो लि. नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनलने इन्सॉल्वन्सी रिझॉल्यूशन प्रोसेस सुरू करण्यात आलेली आहे. दावा निकाली काढण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आह व काम प्रगती पथावर आहे.

## १६) उपदान निधी तरतूद:-

महामंडळाने उपदान विश्वस्त मंडळ स्थापन केले असून ते आयकर कायदा १९६१ अन्वये स्वीकृत करण्यात आलेले आहे. उपदान विश्वस्त मंडळाचे कार्य मरामापमं उपदान निधी विनियम १९६८ नुसार संचलित केलेले आहे. नियम क्रमांक १६(i) (अ) मध्ये असे नमुद केले आहे की (अ) सर्वसाधारण आणि पुरक उपदानाकरिता विश्वस्त मंडळाला द्यावयाचे योगदान वर्षाअखेरीस सर्व पात्र कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील उपदान दायित्वाचे सवलती मुल्य आणि विश्वस्त मंडळाकडे वार्षिक योगदान प्राप्त होण्यापुर्वीच्या रक्कमेच्या फरकापेक्षा जास्त असता कामा नये.

विनियम क्रमांक १९ मध्ये असे नमूद केले आहे की, महामंडळ प्रथमत: त्यांच्या निधीतून उपदानाचे देयक देईल. या देयकांचा स्वतंत्र लेखा ठेवण्यात येईल आणि विश्वस्त मंडळाच्या वार्षिक योगदानाच्या रकमेची गणना करतेवेळी आतापर्यंत दिलेल्या रकमेचा विचार करण्यात येईल.

३१.०३.२०१९ रोजी संपलेल्या वर्षासाठी महामंडळाकडून कोणतीही उपदानाचे दायित्व शिल्लक नसून महामंडळाकडून वास्तविक खर्चानुसार उपादानाची तरतूद केली जाते, सदर पद्धत पुर्वीपासुन अवलंबण्यात आलेली आहे.

## १७) विवाद्य बाबी:-

महामंडळाच्या ठाणे विभागातील दोन आगारांच्या ₹ २९,८८७/- व ₹ १२,५५,८६९/- या दोन रकमांच्या अकृषिक कराच्या निर्धारणासंबंधी महामंडळाने दाखल केलेल्या दाव्याचा निकाल महामंडळाच्या बाजूने लागलेला आहे. संबधित खात्याने दाव्याच्या निकालाप्रमाणे अकृषिक कराचे पुर्निर्धारण अद्याप केले नसल्याने उपरोक्त रकमांच्या दायित्वाची तरतूद लेख्यांमध्ये करण्यात आलेली नाही.

खाजगी व्यक्तिंबरोबर प्रवासी बसेसच्या प्रासंगिक करारांसाठी दिनांक०१-०४-२००८ पासून एकूण रकमेच्या ४० टक्के भागावर सेवा कर देय आहे. सदर सेवा कर संबंधित व्यक्तिंकडून वसूल करून भरावयाचा आहे. परंतु महामंडळाने सेवा कराची वसुली करताना ४० टक्के रकमेऐवजी २५ टक्के रक्कम गृहित धरलेली आहे. उपरोक्त फरकामुळे कमी वसुल केलेल्या व परिणामी कमी भरणा झालेल्या सेवाकराची वसुली संबंधित करारदारांकडून करण्याचे प्रयत्न सुरू असल्याने त्याचे दायित्व लेख्यांमध्ये नोंदविण्यात आलेले नाही. तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळालाकडून ₹ ९२,१२,३७५खाजगी व्याक्तिंकडून ४० टक्के भागावर सेवा कर वसुल करण्यात आलेला आहे. आता पर्यंत ₹ २३,३२,१६५ रूपये वसुल करण्यात आलेली आहे व शिल्लक रक्कम ₹ ६८,८१,२१०/- वसूली करण्याची कार्यवाही सुरू आहे. रा. प. रत्नागिरी व सिधुंदुर्ग विभागाने शाळांना पुरविण्यात आलेल्या प्रासंगिक करारावरील बसेस पासुन मिळालेल्या उत्पन्नावर सेवावर मागणी संदर्भात सेवाकर आयुक्त यांच्याकडे याचिका दाखल केली होती. सदर याचिकेवर सेवाकर आयुक्त यांनी नकार दर्शविणयात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सेवाकर शैक्षणिक संस्थाकडून वसूल केलेला आहे. म्हणुन सेवाकर परत करता येऊ शकत नाही.

## १८ ) पोस्टाच्या टपाल वाहतुकीपोटी येणे:-

"मिळविलेले परंतु प्राप्त न झालेले उत्पन्न" यात पोस्टाच्या टपाल वाहतुकीची रक्कम ₹ ७.७६ कोटी इतकी असून त्यापैकी ₹ ०.१५ कोटी इतकी रक्कम टपाल खात्याने वादग्रस्त ठरविलेली आहे.

## १९) वाणिज्यिक आस्थापनापोटी येणे :-

दिनांक ३१-०३-२०१९ रोजी "मिळविलेले परंतु प्राप्त न झालेले उत्पन्न" यात उपहारगृहासह वाणिज्यिक आस्थापनाकडून येणे असलेल्या ₹ २६.३२ कोटी रकमेचा समावेश आहे. यापैकी ३३९ प्रकरणी न्यायालयात दावे दाखल केलेले असून त्याचे मूल्य, मुद्दल व त्यावरील व्याजासह, ₹ २६.५५ कोटी इतके आहे.

## २०) स्थापत्य अभियांत्रिकी खर्चाचे आकस्मिकता दायित्व :-

स्थापत्य अभियांत्रिकी खर्चाचे आकस्मिकता दायित्व दि. ३१.०३.२०१९ रोजी अंदाजे ₹ २०१.८४ कोटा असून त्यापैकी ₹ २९४.७८ कोटीचे दायित्व अपूर्ण स्वरूपातील आभियांत्रिकी कामाबाबत आहे व ₹ ९२.९४ कोटीचे दायित्व दिनांक ३१-०३-२०१९ पर्यन्त सुरू होऊ न शकलेल्या आभियांत्रिकी कामाबाबत आहे.

## २१) आयकर निर्धारण:-

आयकर कायद्याखाली महामंडळाचे “धर्मादाय संस्था” असे वर्गीकरण निर्धारण वर्ष २००९-१० पासून नसल्याबाबत आयकर खात्याकडून कळविण्यात आलेले आहे. सदर बाब तपासली असता, महामंडळाचे असे मत झाले आहे की, उपरोक्त वर्गीकरण भविष्यातही चालू राहू शकते व त्यामुळे या गृहीतकावर आयकर विवरणपत्र दाखल करण्यात आलेले आहे. तथापि, आयकर प्राधिकाऱ्यांनी मागील काळाचे पुढे ओढलेला तोटा नाकारून सन २००९-१० ते २०१६-१७ या वर्षाचे आयकर विवरणपत्र मंजूर केलेले आहेत. जरी मंजूर आयकर आदेशानुसार देय आयकर निरंक असला तरी महामंडळाने आयकर आदेशाच्या विरूध्द सी. आय.टी (अपिल) - । कडे दावा दाखल केला आहे. त्यांचा निर्णय प्रलंबित आहे.

खालील कर निर्धारण वर्षाकरिता कर निर्धारण अधिकारी यांनी नोटीस जारी केली असून त्या विरोधात मरामापमं ने आयकर आयुक्त (प्रमुक्ती) यांच्याकडे स्थगिती याचिका दाखल केलेली आहे आणि आयकर आयुक्त (अपील) यांचा निर्णय होईपर्यंत स्थगिती असेल.

| निर्धारण वर्ष | रक्कम (₹) |
|---|---|
| २००९-१० | २१०,६४,४४,६७०/- |
| २०१०-११ | १५१,५४,३०,८३०/- |
| २०११-१२ | ९८,९२,८३,०८०/- |
| २०१२-१३ | १८२,९३,९१,७१०/- |
| २०१३-१४ | ३०३,३६,२१,५७०/- |
| २०१४-१५ | ६७,६७,५४,४१०/- |
| २०१६-१७ | २०५,८८,४२,६०८/- |

महाराष्ट्र मार्ग परिवहन महामंडळाने आयकर अधिकाऱ्यांच्या उपरोक्त कर निर्धारण वर्षाकरिताच्या निर्णयाविरोधात अपिल दाखल केलेली आहे.

आयकर आयुक्त (प्रमुक्ती) यांच्या आदेशान्वये मरामापमंने मागणी सूचनेस मुदतवाढ मिळण्याकरिता रू. ४ कोटी कर निर्धारण वर्ष २००९-१०, २०१०-११, २०११-१२ आणि २०१३-१४ करिता जमा केले आहेत (रूपये १ कोटी प्रत्येक मुल्यांकन वर्षाकरिता) आयकर आयुक्त (प्रमुक्ती) यांच्याकडील सुनावणीनंतर सर्व चारहि प्रकरणे आयकर आयुक्त (अपील) यांच्याकडे सुनावणीकरिता पाठविली आहेत आणि त्याकरिता आयकर आयुक्त (अपील) यांनी प्रत्येक मुल्यांकन वर्षाच्या एकूण मागणी सूचना रकमेच्या २०% रक्कम चार हप्यामध्ये जमा करण्याचे आदेश दिले आहेत. मरामापने आयकर कार्यालयाच्या उपरोक्त निर्णयाला स्थगिती दिलेली आहे. हि प्रकरणे आता आयकर आयुक्त (अपिल) यांच्याकडे प्रलंबित आहेत.

मुख्य आयकर आयुक्तांनी कर यांचा आदेश दि.२९.०३.२०१९ एसए क्र. १९०/मुंबई/ २०१९ व आयटए क्र. ५५७७/ मुंबई/ २०१७ दि. २९.०८.२०१७ नुसार निर्धारण वर्ष २०१२-१३ कराची अपिल खारीज केली आहे. कर निर्धारण वर्ष २०१४-१५ करिता आयकर अधिकारी यांनी दिनांक ०२.०२.२०१७ रोजी रू. ६७,६७,५४,४१०/- ची मागणी सूचना जारी केली आहे. ती सीआयटी (अपिल) कडे प्रलंबित आहे.

आयटीएटी मुंबई खंडपीठ डी ने दि. २९.०३.२०१९ रोजी दिलेल्या आदेशानुसार भाडेकरूला निधारण वर्ष २०१२-१३ साठी सहा महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा अपील निकाली येईपर्यंत यापैकी जे आधी असेल ते स्थगित केले आहे.

**२२) बुडीत व संशयीत रकमेसाठीची तरतूद:-**

बुडीत व संशयीत रकमेसाठीची तरतूद विभागांकडून पाठविण्यात आलेल्या माहितीनुसार केली जाते. सदर तरतूद करताना अशाप्रकारे केली जाते की, जेणेकरून त्या वित्तिय वर्षातील सर्व बुडीत व संशयीत रकमा अंर्तभूत होऊ शकतील.

**२३) रजा रोखीकरण:-**

महामंडळाने व्यापारी लेखाकंन पध्दतीचे अनुसरण केले आहे आणि उपार्जित स्वरूपात जमा व खर्च निश्चित केले आहे. महामंडळामध्ये सर्व कर्मचाऱ्यांच्या शिल्लक रजा विचारात घेऊन रजा रोखीकरणाच्या दायित्वाची तरतूद केली जात नाही. महामंडळाच्या धोरणानुसार सेवा निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्याच्या सेवा पुस्तकामधुन अंतिम शिल्लक रजेनुसार रजा रोखीकरण दिले जाते. सेवा निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्याचे शेवटचे मुळ वेतन व महागाई भत्ता या नुसार ठरवले जाते. महामंडळाकडे आर्थिक वर्षा अखेरीस रजा रोखीकर दायित्वाची गणना करण्याचे कोणतेही धोरण नाही. तथापि ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाकरिता भारताच्या नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी रजा रोखीकरणाच्या दायित्वाची गणना केली असून ते अंदाजे रू. ६५३.८४ कोटी इतके आह. सदर गणना महामंडळाच्या वार्षिक लेख्यांमध्ये घेतलेली नाही.

**२४) पोलीस मोटर वॉरंट**

महामंडळ पोलीस मोटार वॉरंट / जेल मोटार वॉरंट आधारे पोलीस आणि तुरूंग विभागीतील लोकांना भाड्याच्या बदल्यात परिवहन सेवा महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एसटीसी / १९७८ / ३६० पीओएल-५ दि २७.०९.१९७९ नुसार पुरविते. सदर शासन निर्णयातील विधान-ब, उपविधान III अनुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाला प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता ३० सप्टेंबर पूर्वी एकरकमी देयक प्रदान करावे. प्रलंबित देयकाकरिता शासन प्रती मास १% व्याज देण्यास किंवा प्रलंबित कालावधीकरीता अदत्त रकमेचा काही हिस्सा देण्यास जबाबदार आहे. या विधानानुसार महामंडळाने प्रलंबित देयकांविरूद्ध रू. ७८,४०,१३,५३५/- इतक्या व्याज रकमेचा पोलीस विभागाकडे दावा केला आहे. उपरोक्त व्याज दाव्याच्या रकमेची वसूली करण्यीची प्रक्रिया सुरू आहे.

२५) केंद्रीय कार्यशाळा दोन प्रकारच्या उपक्रमांमध्ये गुंतलेली आहे उदा. १) दुरूस्ती आणि देखभाल आणि २) नवीन बस बॉडी बिल्डिंग ३) रिकंडिशनिंग ४) रीबॉडी बिल्डिंग यात अनुक्रमे महसुली खर्च आणि भांडवली खर्चाचा समावेश असल्याने, मध्यवर्ती कार्यशाळेच्या खर्चासाठी खर्च लेखा धोरण (कॉस्ट अकाउंटिंग पॉलिसी) विकसित केले होते. या धोरणानुसार, अप्रत्यक्ष खर्च (प्रयोग-तास दर, मशीन-तास तर इ.) दुरूस्ती आणि बॉडी-बिल्डिंग कामांसाठी पुर्व-निर्धारित गृहित-दरावर भूतकाळातील डेटाच्या आधारावर आकारले गेले. महामंडळ वास्तविक खर्चाचे (ओव्हरहेड्स) मूल्यमापन वर्षाच्या शेवटी केले जो आणि संबंधित ओव्हर/अंडरचार्जिंग (ओव्हरहेड्स) अतिरिक्त नोंदीद्वारे श्रम-तास आधारावर दुरूस्त केले जातात.

२६) मध्यवर्ती कार्यशाळांच्या कर्मचाऱ्यांना वर्षभरात अदा होणाऱ्या महागाई भत्याच्या फरकाची अथवा कामगार कराराच्या पुर्वलक्षी प्रभावाने देण्यात येणाऱ्या वेतन फरकाची रक्कम त्या वर्षातील वाहने वा जमिनी या भांडवली खर्चामध्ये समाविष्ट केलेली नसून ती पुर्वकालीन समायोजन खात्यात नोंद केली जाते.

२७) गेल्या वर्षातील आकडयांची आवश्यक तेथे गटवारी व नवीन मांडणी केलेली आहे. नफा-तोटा पत्रक व ताळेबंद यात दर्शविलेले कंसातील आकडे हे गतवर्षाचे, त्या त्या संबंधीत बाबींचे, आतील रकान्यातील (इनर कॉलम) तुलनात्मक आकडे आहेत.

सही, अनुसूची “अ” ते “ल” आणि वार्षिक लेख्यांची भाग असणारी टिप्पणी.

सही/-
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

# खर्चाच्या विभागणीची टक्केवारी
# (२०१८-१९)







## प्रति कि. मी. उत्पन्न व प्रति कि. मी. खर्च ((₹)




| | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|
| उत्पन्न | ३४.८२ | ३४.६८ | ३४.१५ | ३५.२४ | ३९.८५ |
| खर्च | ३७.८९ | ३५.५५ | ३६.७८ | ४०.३० | ४४.५० |



## एकूण उत्पन्न आणि एकूण खर्च ((₹ कोटीत)




| | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|
| उत्पन्न | ७२५८.६६ | ७२८४.४८ | ७०५६.३३ | ७१६८.०१ | ८१२०.२३ |
| खर्च | ७९००.२७ | ७४६७.२४ | ७५९९.९० | ८१९६.२७ | ९०६८.६८ |

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई

## यांच्या दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या वर्षाच्या वार्षिक लेख्यांवरील

## भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा स्वतंत्र हिशेब तपासणी अहवाल

आम्ही सोबत जोडलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद व त्यासोबत जोडलेल्या नफा-तोटा पत्रक आणि निव्वळ महसूली विनियोजन लेखा यांचे मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम १९५०, कलम- ३३(२) अन्वये लेखा परीक्षण केले. सदर वित्तीय तक्त्यांची जबाबदारी ही महामंडळाच्या व्यवस्थापनाची असून आम्ही केलेल्या लेखा परीक्षणाच्या आधारे त्यावर मत प्रदर्शित करणे ही आमची जबाबदारी आहे.

या स्वतंत्र लेखापरिक्षण अहवालात भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी दिलेले अभिप्राय हे केवळ लेखा नोंदीचे वर्गिकरण, सर्वोत्तम लेखानोंदी पद्धती, लेखानोंदणी मानके आणि प्रगटीकरण मानदंड इत्यादी बाबत आहेत. वित्तीय घडामोडीत कायदे पालन, नियम, व अधिनयम (मालकी व नियामक) आणि कार्यक्षमता व कामगिरी इत्यादि संदर्भात काही लेखा निरीक्षणे असल्यास त्याचे परिक्षण अहवाल/भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा लेखा परिक्षण अहवाल स्वतंत्रपणे देण्यात येतात.

आम्ही सध्या भारतामध्ये स्विकृत असलेल्या लेखा परीक्षणाची मानके यानुसार लेखा परीक्षण केले आहे. सदर मानकांप्रमाणे लेखा परीक्षणाच्या कामाच्या नियोजन व अंमलबजावणीमध्ये वित्तीय तक्त्यांमधील महत्वाच्या त्रुटी टाळण्यासाठी सर्वसाधारण काळजी घेणे आवश्यक आहे. लेखा परीक्षणामध्ये वित्तीय तक्त्यांमधील रकमांच्या समावेशांचे पुरावे काही प्रमाणात तपासण्याचा समावेश होतो. लेखा परिक्षणामध्ये लेखा मानकांच्या अंमलबजावणीची तपासणी व वित्तीय तक्त्यांची मांडणी तपासणे याचाही समावेश होतो. आमच्या समजुतीनुसार आमचे लेखा परीक्षण मत व्यक्त करण्यास पुरेसा आधार आहे. लेखा परिक्षणाच्या आधारे खालील दाखला देण्यात येत आहे.

i) आमच्या माहितीनुसार लेखा परीक्षणास आवश्यक असणारी माहिती व त्याबाबतचे खुलासे आम्हास प्राप्त झालेले आहेत.

ii) या दाखल्याशी संबंधित महामंडळाचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक, मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम १९५०, कलम ३३(१) नुसार राज्य शासनाने भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्याशी सल्लामसलत करून ठरविलेल्या नमुन्यात तयार करण्यात आलेले आहेत.

iii) आमच्या मते महामंडळाच्या लेख्यांच्या पुस्तकांची तपासणी केली असता असे आढळुन आले आहे की, मार्ग परिवहन महामंड़ळ अधिनयम१९५०, कलम ३३(१) बाब क्र.IV व V नुसार महामंडळाने लेख्यांची पुस्तके व इतर कागदपत्रे (रेकॉर्डस) व्यवस्थितरित्या ठेवण्यात आलेले आहेत.

iv) पुढे असे नमूद करण्यात येते की,

**अ) <u>ताळेबंद</u>**

**भांडवल व दायित्व**

**भांडवली अनुदान ₹ ४९३७.७० कोटी**

**भागभांडवलाचा तपशील (अनुसुची ब) ₹ १३९७.९८ कोटी**

१. मार्ग परिवहन महामंडळ कायद्याच्या कलम २३(३) अनुसार "राज्य शासन निश्चित करेल त्यानुसार महामंडळाचे अधिकृत भांडवल समभाग विभागले जाईल आणि राज्य शासनाला केंद्र शासनाला तसेच इतर पक्षांना (यामध्ये ज्यांचे उपक्रम महामंडळाने अधिग्रहित केले आहेत अशा लोकांचा देखील समावेश आहे.) यापैकी किती समभाग संख्या देण्यात येईल हे राज्य शासन निश्चित करेल ₹ १३४१.२० कोटीचे साधारण

भागभांडवल राज्य शासन आणि ₹५६.७७ कोटी केंद्र शासनाने दिलेले आहे. परंतु महामंडळाने अजुनही समभागांचे राज्य शासन आणि ₹ ५६.७७ कोटी केंद्र शासनाने दिलेले आहे. परंतु महामंडळाने अजुनही समभागांचे वितरण केल्याचे समभाग प्रमाणपत्र जारी केलेले नाही. परंतु त्याचा आदेशान्वये पाठपुरावा करण्यात आला नाही जेणे करून महामंडळ राज्यशासनाकडे याबाबत पाठपुरावा करू शकेल. तथापि असे निरिक्षणात आले आहे की समभागांची दर्शनी किंमत निश्चित करण्याकरिता महामंडळाने राज्य शासनाकडे पाठपुरावा केलेला नाही.

**२. भांडवली अनुदान (अनुसुची ब-२) ₹ २३७.१०कोटी**

**बसस्थानकाचे आधुनिकीकरण : ₹ २१२.६८ कोटी**

यामध्ये ₹ १.१५ कोटी (१,१४,८२,२६२/-) ही रक्कम समाविष्ठ नव्हती जी फेब्रुवारी २०१९ मध्ये रा.प.महामंडळास सौचालय बांधण्यासाठी सीएसआर अंतर्गत बीपीसीएल आणि रा.प. महामंडळ यांच्यातील सामंजस्य करारानुसार मेसर्स भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमीटेडकडून पहिला हप्ता म्हणुन मिळाली होती त्याचा हिशोब विचारात घ्यायला हवा होता. चुकीच्या लेखानोंदीमुळे ₹१.१५ कोटीने भांडवली अनुदान कमी दाखविण्यात आले व सध्याची मालमत्ता (बॅक शिल्लक) कमी दिसली.

**३. शासनाकडून मिळणारे भांडवली अंशदान (अनुसुची ब-३) ₹ ३,२९७.४४ कोटी**

यामध्ये माहे मार्च २०१९ ची रक्कम ४१.९४ कोटी समाविष्ठ केलेली नाही. त्याऐवजी हि रक्कम शासनास अदा करावयाचे महसुली दायित्व म्हणुन दर्शविली आहे. शासन निर्णयानुसार मार्च २०१९ च्या मासिक अहवालानुसार एकुण प्रवासी कर ₹ ७७.०३ कोटी पैकी रक्कम ₹ ४१.४३ कोटी (१० टक्के) रक्कम शासनाच्या भांडवली अंशदानाची होती व देय प्रवासी कर ₹ ३५.०९ कोटी (७.५ टक्के)होता. चुकीच्या लेखानोंदीमुळे ₹ ३५.०९ कोटीने "धनको (महसुली दायित्व)" वाढीव दिसुन येत आहेत. तसेच "शासनाचे भांडवली अंशदान" कमी दिसुन येत आहे.

आर्थिक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७०२०१७-१८ मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती. परंतु त्यावर अद्यापर्यत सुधारले गेले नाही.

**४. निधी (अनुसुची-सी) - ₹ ३६३८.२१ कोटी**

**घसारी निधी (अनुसुचि-ई-) ₹ ३२८८.२९ कोटी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ घसारा निधी नियम, २००६ मधील नियम क्र. १२ (२००९ मध्ये सुचित) नुसार घसारा निधीचा केवळ मालमत्ता संपादन/पुनर्स्थापना करण्याच्या उद्देशाने उपयोग होतो, उर्वरित निधीची गुंतवणूक विवक्षित संख्यामध्ये (भारतीय विश्वस्त अधिनियम १९५० अधिकृत) किंवा बँकेत जमा करणे आवश्यक होते.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नियम १९५० अ.क्र. ३० (ग) प्रमाणे घसारा निधी गुंतवणुकीची आरंभीची शिल्लक, वर्षादरम्यान केलेली गुंतवणूक आणि वर्षाच्या शेवटी असलेली एकुण गुंतवणूक दर्शविणे आवश्यक आहे. महामंडळाने घसारा निधीमधुन कधीही गुंतवणुक केली नसुन ती दर्शविली नाही. रस्ता वाहतूक महामंडळ अधिनियम १९५० च्या नियम क्र. २९ नुसार महाराष्ट्र सरकारच्या पुर्व मंजूरीशिवाय, घसारा निधी हा निधीच्या इ. बाबीवर वापरण्यात आला आहे.

घसारा निधीचा वापर आणि लेख्यांमधील प्रदर्शन वैधनिक तरतूदींनुसार नव्हते.

आर्थिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये सदर बाब लक्षात आणुन दिलेली आहे. परंतु त्यावर अद्यापर्यंत सुधारले गेले आहे.

५. **व्यापारासंकुलावरील अधिकमुल्य**

**अ) सरकारी जमिनी ₹ ९.८९ कोटी**

**ब) इतर जमिनी ₹ ६२.१९ कोटी**

महाराष्ट्र शासन निर्णय गृहविभाग (फेब्रुवारी, मार्च २००१) नुसार महामंडळास मालकी हक्काने प्राप्त झालेल्या शासकीय जमिनीचा व्यापारी तत्वावर उपयोग करून मिळणाच फायदातील शासनाला मिळावयाचा ५० टक्के हिस्सा (अनर्जित रक्कम) ज्या वर्षात अशा जमिनीचा व्यापारी तत्वावर वापर सुरू होईल तेव्हापासून प्रथम ५ वर्षासाठी बिन व्याजी कर्ज म्हणून शासनाकडून महामंडळाला दिल्याचे दर्शविण्यात यावे. तद्नंतर हे कर्ज महामंडळाने एक रकमी न फेडल्यास ते व्याजी कर्ज म्हणुन राहील आणि त्यावर त्यावर्षाच्या कमाल व्याज दराने व्याज देय राहील. महामंडळाने शासनाकडून घेतलेल्या ८ जागांवरती जुलै २००३ ते एप्रिल २०१० या कालावधीतील व्यापारी संकुले विकसीत केली आहे आणि त्यापोटी ₹ ७.८८ कोटी अधिमूल्य प्राप्त झाले आहे. परंतु वरील शासननिर्णयनुसार शासनास देय होणारे कर्ज निश्चित केलेले नाही तसेच लेख्यांमध्ये याबाबत तरतूद केलेली नाही. याबाबत हे दर्शविणे उचित आहे की, एका प्रकल्पाच्या (मेळा स्टॅण्ड, नाशिक) अनअर्जित उत्पन्न ₹ २.८८ कोटी बाबत ऑक्टोबर २०११ मध्ये नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयाने मागणी केली होती परंतु सदर रक्कम अदा करण्यात आली नाही अथवा याबाबत वार्षिक लेख्यांच्या भाग असलेल्या टिप्पणीमध्ये दर्शविण्यात आलेले नाही.

आर्थिक वर्ष २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती. परंतु त्यावर अद्यापर्यंत सुधारले गेले नाही.

६. **तरतूद (परिशिष्ट - इ) ₹ १४.५० कोटी**

कॉर्पोरेशन/महामंडळाने व्यापारी लेखा प्रणालीचे अनुपालन केले आणि उत्पन्न आणि खर्च जमा आधारावर नोंदवला. त्यानुसार, कर्मचारी ज्या वर्षात सेवा देतात त्या वर्षासाठी रजा रोखीकरण दायित्वाची तरतूद केली जावी. ३१ मार्च २०१९ रोजी महामंडळात १,०१,२६१ कर्मचारी होते. तथापि या कर्मचाऱ्यांच्या संचति रजेच्या शिलकीसाठी खर्चाचा हिशेब केवळ वास्तविक पेमेंटच्या आधारावर केला. महामंडळाने रजा रोखीकरण दायित्वाची गणना संख्याशास्त्रज्ञाने अहवालाद्वारे केली. ज्यानुसार दायित्व ₹ ६५३.८४ कोटी आहे. तथापि, संख्याशास्त्रज्ञाने अहवालानुसारचे दायित्व देखील आर्थिक विवरणांमध्ये नोंदवले गेले नाही. यामुळे वर्षातील तरतूदी, खर्च आणि तोटा ₹ ६५३.८४ कोटी इतका कमी नोंदवला गेला, तसेच त्या प्रमाणात संचित तोटाही कमी नोंदवला गेला.

७. **किरकोळ धनको**

**महसुली दायित्वे :- ₹ १६७५.०९ कोटी**

यामध्ये कर्मचाऱ्यांच्या वेतन पुनरिक्षण थकबाकीकरिता ₹ ९७७.१८ कोटीचा समावेश आहे (पगाराची थकबाकी ९३८.६३ कोटी जुलै ते सप्टेंबर १८ पर्यंतची महागाई भत्ता थकबाकी ₹१२.३० कोटी, जानेवारी ते मार्च २०१९ पर्यंतची महागाई भत्त्याची थकबाकी ₹ १८.४५ कोटी आणि ऑक्टोबर ते १८ ते मार्च १९ पर्यंतची अधिकाऱ्याची सुधारीती वेतनची थकबाकी ₹ ७.८० कोटी) अंदाजे नोंदवलेल्या आधारावर आणि कर्मचाऱ्यांच्या तपशीलवार सुचीद्वारे बनवलेले नाही. अशाप्रकारे तपशीलवार डेटा उपलब्ध नसल्यामुळे दायित्वाच्या तरतूदीची अचुकता लेखापरिक्षणात निश्चित करता आली नाही.

८. **बँकातील शिल्लक व रोकड शिल्लक**

**(ओव्हरड्रॉन किंवा क्रेडीट बॅलन्स)**

**स्टेट बॅक ऑफ इंडीया : १२१.३७ कोटी**

यामध्ये एसबीआय मुकुंदवाडी-शाखेतील ₹ ३७.४९ लाख क्रेडिट शिल्लक सामाविष्ट आहे. तथापि, बॅक स्टेटमेंटनुसार शिल्लक १९.३१ लाख (पॉझिटीव्ह बॅलन्स) होती. अशा प्रकारे ₹ १८.१८ लाखांचा फरक येत आहे. मध्यवर्ती कार्यशाळा, औरंगाबाद ने हि वसंगती स्पष्ट करण्यासाठी बँक शिल्लकीच्या हिशोबातील तफावर निदर्शनास आणुन दिलेली असली तरी, मध्यवर्ती कार्यशाभा, औरंगाबाद ने बँक शिल्लकीचा मेळ घालण्यासीठी योग्य उपाययोजना केल्या नाहीत. या विसंगतीने असे सुचित केले की लेखा प्रणालीमध्ये अनेक व्यवहारनोंदवले गेले असावेत ज्यामुळे लेखा प्रक्रियेतील/हिशेबातील नियंत्रणाविषयीचा कमकुवतपणा उघड येतो.

९. **संपत्ती व मालमत्ता**

**स्थिर मालमत्ता (अनुसूची अ)**

**स्थिर मत्ता (स्थुल आकडा ३१.०७.२०१९ पर्यंत) ₹ ४२६३.७८ कोटी.**

वरील रकमेत ३१ इमारती (बस स्थानके, प्रशासकीय इमारती, कर्मचारी वसाहत इत्यादी) चा समावेश नाही बीओटी डेव्हलपर्सनी जुलै २००३ ते मार्च २०१७ दरम्यान हस्तांतरित केलेल्या या इमारतीची या अंदाजित रक्कम ₹२४.९४ कोटी आहे. किंमतीची किंमत आहे. महामंडळाच्या बिल्ड ऑपरेशन आणि ट्रान्सफर (बीओटी) प्रकल्प या धोरणानुसार ३० वर्षाच्या कालावधीत बीओटी विकासकाकडून प्रिमियम संकलित करणे. विकासकाने महानगरपालिकेच्या वैशिष्टयांनुसार प्रिमियमची रक्कम रोख स्वरुपात आणि (करारात नमूद केलेल्या इमारती व इतर पायाभूत सुविधांद्वारे) द्यायची होती.

महामंडळाने या मालमत्तांचे (प्रिमीयमच्या बदल्यात दिलेली रक्कम) लेखांकन हिशेब पुस्तकात त्याच्या वाजवी/अंदाजित मूल्यानुसार केलेले नाही. परिणामी, मालमत्ताची नियमीत प्रत्यक्ष पडताळणी होऊ शकली नाही व ही मालमत्तांवरील नियमात त्रुटी आहे. या मालमत्तेचे तपशीलवार विभाजन विविध श्रेणींमध्ये (उदा. इमारती, फर्निचर, फिटिंग्ज, प्लांट मशिनरी आणि उपकरणे इ.) उपलब्ध नाही. मालमत्तेचे वर्गीकरण न केल्यामुळे या मालमत्तेवरील घसारा परिगणित करणे शक्य नाही.

आर्थिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती. परंतु त्यावर अद्यापर्यत सुधारले गेले नाही.

१०. यामध्ये ₹ ३०८.९२ कोटीच्या कच्चा इमारतींचा समावेश आहे (लेखाशिर्ष क्र. ८, ८ अ आणि ८ क) त्यात २०१८-१९वर्षी ₹ ३२.७८ कोटीच्या स्थिर मतामध्ये भर पडली आहे. स्थिर मत्तेत अशी वाढ दर्शविणाऱ्या प्रमाणकांची (वाऊचरांची) तपासणी केली असता लक्षात आले की, ही सर्व भर नियमीत दुरूस्त्या/विशेष दुरूस्त्या/फेरबदल/ रंगकाम/वायरींग इत्यादी प्रकारची काम भांडवली खर्च स्वरूपाची नाहीत आणि त्यांचे कच्चा इमारती असे वर्गीकरण करता येणार नाही.

महामंडळाने कच्ची बिल्डिंग आणि पक्की बिल्डींग मधील फरक स्पष्टपणे परिभाषित केला नाही किंवा स्थर मत्ता म्हणुन विचारात घेण्यासाठी खर्चाची किमान मर्यादा निश्चीत केली नाही. स्थिर मत्त्यामध्ये नियमीत वावर्ती दुरूस्तीच्या खर्चाचा समावेश केल्यामुळे स्थिर मत्ता रू. ३२.७८ कोटीने अधिक दाखवली गेली आणि त्याच प्रमाणात वर्षासाठीचा खर्च आणि तोटा तसेच संचित तोटा कमी दाखवला गेला.

आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती. परंतु त्यावर महामंडळाकडून अद्यापर्यंत कच्चा इमारती व स्थित मालमतेबाबतची काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

११. यामध्ये साक्री येथील २२,००० मीटर $m^2$ इतक्या भूखंडाचा समावेश आहे (१९८९ मध्ये रू. ३.३६ लाखांना विकत घेतलेला होता.) या जमिनीवर एका शैक्षणिक संस्थेने (विद्या विकास मंडळ, साक्री (वि.वि.म.) अनधिकृतपणे कब्जा केला होता आणि ७६५ $m^2$ क्षेत्रफळाचे दोन्ही अप्रोच (प्रवेश करण्याचे रस्ते) देखील ब्लॉक करण्यात आले/अडवले होते ज्यामुळे तेव्हापासुन (१९८९) जमिनीत प्रवेश नाकारण्यात आला होता. ताळबंदाच्या तारखेला हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. परंतु महामंडळाला जमिनीवर प्रवेश आणि नियंत्रण नव्हते आणि हे योग्य नोंदणाद्वारे दाखवायला हवे होते. महमंडळाच्या अभियांत्रीकी विभागाने २००४-२००५ पासुन त्यांची जमीन धारण नोंदवली अद्ययावत केली नाहीये आणि जमीन अतिक्रमणाच्या घटना आर्थिक विवरणपत्रांमध्ये उघड केली गेली नाहीत. अशा घटनांची नोंद न होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**१२. चालु मालमत्ता**

**उच्चल आणि ठेव (अनुसुची-एल) ₹ ६६.५७ कोटी**

महामंडळाच्या प्रचलित लेखा धोरणानुसार सात कार्यकारी अभियंता कार्यालयाचे बँकेचे व्यवहार (खर्च/जमा) संबंधीत विभागीय कार्यालयाकडुन सी.इ. सस्पेन्स लेखाशिर्षातुन लेखांकित केल्या जातात त्यानंतर कार्यकारी अभियंता कार्यालयाकडुन सी.इ. सस्पेन्स लेखाशिर्षातील रक्कम योग्य लेखाशिर्षास दर्शविली जाते. तथापि, ३१.०३.२०१९ रोजी सी.इ. सस्पेन्स लेखाशिर्षामध्ये शिल्लक रकमेपोटी ताळमेळ नसल्यामुळे ₹ २.८५ कोटी (कार्यकारी अभियंता, औरंगाबाद, नांदेड, आणि पुणे) आणि जमा असलेली शिल्लक ₹ २.१८ कोटी (कार्यकारी अभियंता, नागपुर, मुंबई, नाशिक आणि अमरावती) दिसुन येत आहे. तसेच रू. ०.६७ कोटी (₹ २.८५ कोटी - ₹ २.१८ कोटी) चे ताळमेळ घालने गरजेचे आहे.

आर्थिक वर्ष २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये सदरबाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती. परंतु त्यावर अद्यापर्यंत सुधारले गेले नाही.

**१३. इतर ऋणको :- ₹ ९०८.८४ कोटी**

यामध्ये सन १९७९-८० ते २०१५-१६ या कालावधीतील व्यवसायिक आस्थापनांकडून मुळ देय रक्कम ₹ २३.२६ कोटी (₹ २३,२५,६३,२८१) इतकी समाविष्ट आहे. यामध्ये ₹ २५.९४ कोटी ) ₹ २५,९३,७४,२८०) हे मुख्य उत्पन्न देखील सामाविष्ट आहे जे १९८१-८२ ते २०१५-१६ या कालावधीशी संबंधित खाजगी पक्षकारांकडून (चांगले कर्ज मानले गेलेले) मिळालेले नाही. गेल्या अनेक वर्षापेक्षा जुन्या दाव्यांची वसुली होणे अतिशय कठीण आहे हे लक्षात घेता ₹ ४९.२० कोटींच्या बुडीत कर्जाची तरतूद असायला हवी होती. तीन वर्षापेक्षा जुन्या अशा थकबाकीदारांच्या व्यवहाची नोंद ठेवण्यासाठी महामंडळात कोणतेही विहित धोरण नव्हते. यामुळे इतर ऋणको ₹ ४९.१९ कोटींनी जास्त दिसत आहे आणि तेवढया प्रमाणात वर्षासाठी खर्च आणि तोटा कमी नोंदवला जात आहे. हे २०१७-१८ साठी एसएआर (वैधानिक लेखापरीक्षण अहवाल/स्टट्युटरी लेखापरीक्षीत अहवाल) मध्ये देखील निदर्शनास आणले होते. परंतु ते अद्याप पर्यंत सुधारण्यात आलेले नाही.

१४. तिकीट ट्रे गहाळाचे (₹ १६.४४ लाख), खाजगी एजंटकडून नुकसान/रक्कम महामंडळास न भरल्याचे (₹ ९७.१७ लाख), चोरी/दरोड्यातील रोकड हरवणे (₹७४.३३ लाख) आणि वाहकाच्या रोकड रक्कमेमधील लागलेले तुटीचे (₹ १९.२३ लाख) व स्वाईप मशिने लागलेली तुट (₹ ४३.२९ लाख) असे एकुण ₹ २.५० कोटीचा अंर्तभाव वरील रकमेत आहे. वरील सर्व गहाळ/चोरी/तूट इत्यादी रकमा नियमित येणे प्राप्त खाते म्हणून वर्गीकरण केले जाऊ शकत नाहीत. प्रचलित लेखा मानांकनानुसार वरील सर्व नुकसानांच्या रकमांची तरतूद करणे आवश्यक आहे. महामंडळाच्या लेख्यात तरतूद न केल्यामुळे ₹ २.५० कोटीने इतर ऋणको जास्ती झाल्याचे दिसुन येत आहे व महामंडळाचा तोटा व संचित तोटा कमी झालेला आहे.

आर्थिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये सदर बाब लक्षात आणुत देण्यात आलेली होती. परंतु त्यावर अद्यापर्यत सुधारले गेले नाही.

**१५. बॅक आणि रोख शिल्लक :- ₹ १७६.८९**

**मार्गस्थ रोकड ₹ ४.३३ कोटी**

₹ ३.८४ यामध्ये महामंडळ ज्याबाबत कोणत्याही प्रकारे अभिलेख नोंदी/हिशेब मेळ विवरणपत्र इत्यादी सादर करू शकत नाही अशी रक्कम म्हणजे मार्गस्थ रोकड होय. गहाळ रक्कम एक वर्षापासुन शोधु शकलेले नाही/सदर रकेमचा ताळमेळ घालता आलेला नाही अशा रक्कमा पुराणमतवादी लेखाकंन तत्वानुसार योग्य तरतूदीची आवश्यकता असते. वित्तीय विधानामध्ये अशा प्रकारे दर्शविलेल्या रोकड रकमेचा तपास करणे/निर्लेखित करणे आवश्यक असते. यामुळे "चालु मत्ता" (रोकड) विधानात ₹ ३.८४ कोटाने जास्त झाल्याचे दिसुन येत आहे व महामंडळाचा तोटा व संचित तोटा कमी झालेला आहे. रोकड देखरेखीवरील आंतरीक नियत्रण कमजोर राहिले आहे.

**१६. बॅक आणि रोख शिल्लक :- ₹ ३१.४७ कोटी**

दोन विभागीय कार्यालयांच्या लेखापरिक्षणामध्ये "हाती असलेली रोकड" अंतर्गत दर्शविलेली रक्कम शिल्लक ही ₹ ३१.९८ लाखांनी (धुळे व जळगाव) जास्त दिसुन येत आहे. आगार कार्यालयानी प्रत्यक्ष शिल्लक प्रमाणित करण्या ऐवजी दररोज जमा होणारी रोकड शिल्लक प्रमाणित केली आहे. प्रत्यक्षात अनधिकृत खर्चाच्या नोंदीमुळे रोकड रकमेत तुट आहे. सर्व विभागीय कार्यालयांमध्ये ही पध्दत असल्याने त्यामध्ये दुरुस्तीची आवश्यकता आहे. नमूना तपासणी केल्याने दुरुस्तीची रक्कम परिगणित करता येत नाही व ही चुकीची प्रथा सर्व विभागीय कार्यालयामध्ये सुरू आहे. याबाबत मागील वर्षीही कळविण्यात आले होते.

आर्थिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती. परंतु त्यावर अद्यापर्यंत सुधारले गेले नाही.

**१७. इतर विविध खर्च : ₹ ९२.५४ कोटी**

वरील खर्चामध्ये कॅश पिक अप एजंटचे ₹ ०.६६ कोटी (₹ ६५,४६,८४६)ची नोंद घेण्यात हवी होती, परंतु ती लेखानोंद घेण्यात आलेली नाही.

सदर खर्चाची तरतूद न केल्यामुळे वर्षभरातील दायित्व खर्च, तोटा व सचिंत तोटा ₹ ०.६६ कोटीने कमी झाला आहे.

**१८. नफा आणि तोटा पत्रक**

**चालन उत्पन्न**

**प्रवाशांकडून उत्पन्न :- ₹ ७७७८.८७ कोटी**

यात ₹ ७७.२१ कोटी (₹७७,२१,५६,०४९) ची रक्कम सामाविष्ट आहे जी अपघात सहायता निधी फंड (लेखाशिर्ष क्र. ७५२-ए) मधुन २०१८-१९ मधील १८० दुष्काळग्रस्त तालुक्यातील विद्यार्थ्याला मासिक पासवर सवलत महसुल माफ म्हणुन हस्तांतरित करण्यात आली होती. हे हस्तांतरण निधीचे व्यवस्थापन करणाऱ्या विश्वस्त मंडळाच्या मंजुरीशिवाय करण्यात आले. मंडळाने (डिसेंबर २०१८) बुडालेल्या उत्पन्नाच्या नुकसानाची भरपाई करण्यासाठी विश्वस्त मंडळाच्या ऑब्जेक्ट क्लॉजने (दरामू मतोलो) त्याच्या निधीच्या अशा वापरास परवानगी दिली नाही. विश्वस्त मंडळाकडून वाहतूक महसूलाची भरपाई करण्यासाठी निधी वापरण्याची परवानगी नसताना, हस्तांतरणाच्या मार्गाने उत्पनांची नोंद अनधिकृत होती. यामुळे उत्पन्न ₹ ७७.२९ कोटीचा जास्त दाखवला गेला आणि वर्षासाठीचा तोटा तसेच संचति तोटा तेवढ्या प्रमाणात कमी दाखवला गेला.

**१९. कमकुवत अंतर्गत नियंत्रण**

महामंडळाने विभागीय नियंत्रकांचे कार्यालय, मध्यवर्ती कार्यशाळा आणि कार्याकारी अभियंता कार्यालय इत्यादीचा समावेश असलेल्या४३शाखा कार्यालयामधून आलेल्या वित्तीय माहितीच्या आधारे वित्तीय विधान संकलित केले आहे. आमच्या असे निरिक्षणात आले आहे की "

अंतर्गत लेखापरिक्षण विभाग" असा स्वतंत्र नियंत्रक विभाग असून तसेच विभाग असून तसेच विभागातर्फे नियमितपणे सर्व शाखा कार्यालयाची वार्षिक तपासणी होत असूनही शाखा कार्यालयातील लेखा माहितीचे लेखापरिक्षण करण्यात आलेले नाही. यामुळे अंतर्गत नियंत्रण कमकुवत होते आणि त्यामुळे चुकीच्या नोंदी, चुकीचे वर्गीकरण, मुद्रांकन त्रूटी इत्यादी कमतरता वार्षिक लेख्याचे संकलन करतांना मध्यवर्ती कार्यालयाला लक्षातही येणार नाहीत.

आर्थिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती. परंतु त्यावर अद्यापर्यंत सुधारले गेले नाही.

२०. सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम २००६ च्या कलम २२ प्रमाणे प्रत्यक्षक खरेदीदाराने त्याच्या वार्षिक लेखांमध्ये सुक्ष्म व लघु उद्योगांना वर्षा अखेरीस देय असलेल्या मुळ रक्कम व त्यावरील व्याज अश्या उद्योगांना प्रत्यक्ष दिलेले व्याज व अश्या उद्योजकास उशिरा करण्यात आलेली प्रदान याची माहिती दर्शविने आवश्यक आहे. तथापि महामंडळाने दि. ३१.३.२०१९ रोजी अश्याप्रकारे थकीत असलेल्या रकमा वा त्यावरील व्याजाचे दायित्व लेख्यांमध्ये दर्शविले नसून त्यामुळे उपरोक्त अधिनियमाच्या कलम २७ प्रमाणे आवश्यती कार्यवाही होऊ शकते.

आर्थिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती. परंतु त्यावर अद्यापर्यत सुधारले गेले नाही.

२१. बांधा, विका आणि हस्तांतरीत करा (बिओटी) या योजनेअंतर्गत महामंडळ आपली रिक्त जागा विकसित करीत आहे, ज्यात विकासकांमार्फत तृतीय पक्षाला व्यापारी संकुलन तयार करण्यासाठी रिक्त जमीन बीओटी-डेव्हलपरकडे ३० वर्षासाठी भाड्याने हस्तांतरित केली जाईल. वर्षाच्या लीज कालावधी करिता महामंडळ एकरकमी (स्थगित उत्पन्नाच्या रूपात वर्गीकृत) अधिमूल्य गोळा करते आणि अधिमुल्य एक तृतीअंश भाग संपुर्ण ३० वर्षाच्या भाटेपट्टीच्या कालावधीत वार्षिक उत्पन्न म्हणून नोंदविते. बीओटी-डेव्हलपरकडून व्यावसायिक संकुलाची बांधकाम पूर्ण झाल्यावरच वार्षिक उत्पन्न नोंदविणे योग्य होईल. विकासकाद्वारे प्रकल्प लांबणीवर पडल्यास किंवा अर्धवट सोडल्यास महामंडळाला त्यांचे वार्षिक उत्पन्न व्यावसायिक भाडयाचा कालावधी सुरू न झाल्याने नोंदविता येत नाही. बॉट डेव्हलपरद्वारे डिफॉल्ट/विलंब झाल्यास महामंडळाचा उत्पन्नाची नोंद चुकीची ठरू शकते जेथे महामंडळ विकासकाच्या विलंब/डिफॉल्टमुळे कोणतेही वार्षिक उत्पन्न नोंदवला जाऊ शकत नाही.

आर्थिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती. परंतु त्यावर अद्यापर्यत सुधारले गेले नाही.

**२२. आकस्मिक दायित्वांचे (संभाव्यकथित देणी) उघड न करणे**

महामंडळाने केवळ रस्ते अपघातांशी संबंधित चालू असलेल्या न्यायालयीन खटल्यांच्या बाबतीत आकस्मिक दायित्व (संभाव्यकथित देणी) नोंदरले होते. कर्मचाऱ्यांनी आणि नोकरीसाठी इच्छुकांनी महामंडळा विरूद्ध केलेले दावे आर्थिक ताळेबंद आणि संबंधित कागदपत्रांचा भाग असलेल्या टिपणीमध्ये याचा हिशोब आणि त्याची नोंद केली गेली नाही. अशाप्रकारे, आकस्मिक दायित्वाची नोंदीत न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या कर्मचाऱ्यांच्या दाव्यांची नोंद कमी आहे. मध्यवर्ती कार्यशाळा (औरंगाबाद) मधील कर्मचारी विभागाद्वारे देखभाल केलेल्या न्यायालयीन केस रडिस्टरच्या (खटला नोंदवही) आमच्या चाचणीत, आम्ही असे निरीक्षण केले की वेतन, पदोन्नती, वसुली, पुनस्थापना इत्यादी बाबीवर महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी आठ न्यायालयीन खटले दाखल केले होते. ज्यांचा खुलासा करण्यात आला नव्हता.

**२३. वार्षिक लेख्याशी भाग असलेल्या टिपणी**

**टिपणी क्र. २२ - बुडीत व संशयीत कर्जासाठी तरतूद**

बुडीत व संशयीत कर्जासाठी तरतूद या संदर्भीतील टिप क्र. २२ मध्ये संदर्भाकडे आपले लक्ष वेधण्यात येते. जो खालीलप्रमाणे होता :-

महामंडळीच्या धोरणानुसार बुडीत व संशयास्पद कर्जासाठी तरतूद विभागांनी दिलेल्या माहितीच्या आधारे तयार केली जाते. बुडीत व संशयास्पद कर्जाच्या तरतूदीशी संबंधित शिल्लक अशा पातळीवर राखली जाते की त्या विशिष्ट आर्थिक वर्षातील संभाव्य खराब आणि संशयास्पद कर्जे सामाविष्ट करता येतील.

महामंडळाकडे बुडीत व संशयास्पद कर्जाच्या तरतूदीबाबतचे संचालक मंडळीने मंजुर केलेले धोरण नव्हते ज्यात कर्ज/प्राप्तीवरील तरतूद ओळखण्यासाठी अटी कर्जाचे वय. भौतिकता (मटीरीअलिटी) इत्यादी स्पष्टपणे नमूद केले असेल. बुडीत कर्जाची ओळख आणि तरतूद सक्षम करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे / धोरण नसताना. विभागीय कार्यालयांनी तरतूदीची आवश्यकता अचुकपणे नोंदवली नाही. अशाप्रकारे टिपणी क्र. २२ मधील खुलासा त्या प्रमाणात वस्तुस्थितीनुसार चुकीचा होता.

**२४. महालेखापाल कार्यालयाने निदर्शनास आणुन दिल्यानुसार व्यवस्थापनाने अलेखापरिक्षीत लेख्यांमध्ये खालील सुधारणा केल्या आहेत.**

(₹ कोटीत)

| तपशील | नावे | जमा | नक्त परिणाम |
|---|---|---|---|
| उत्पन्न | ६.०४ | ०.०० | ६.०४ |
| खर्च | ४१.९२ | ०.०० | ४१.९२ |
| मत्ता | ०.०३ | ९.८२ | ९.७९ |
| दायित्व | ०.०० | ३९.३१ | ३९.३१ |

लेखा टिप्पणीच्या नक्त परिणामामुळे (१) मत्तेमध्ये ₹ ९.७९कोटीची घट झालेली आहे. (२) दायित्वांमध्ये ₹ ३९.३१ कोटीची वाढ झालेली आहे. (३) खर्चामध्ये ₹ ४१.९२ कोटीची वाढ झालेली आहे. (४) उत्पन्नात ₹ ६.०४ कोटीने घट झालेली आहे.

VI) आमच्या माहीतीनुसार व आम्हास सादर केलेल्या खुलाश्यानुसार सदर आर्थिक तक्ते व लेख्यांचे धोरण व

अ) ताळेबंदात महामंडळाची दि. ३१.०३.२०१९ ची सत्य व वास्तविक स्थिती दर्शविली आहे व

ब) नफा-तोटा पत्रकात, त्या तारखेस संपलेल्या आर्थिक तोट्याची सत्य व वास्तविक स्थिती, दर्शविली आहे.

जोडपत्र “दोन” मध्ये लेख्याचा आढावा घेतल्यानंतर एकत्रित तयार केलेली महामंडळाची गेल्या तीन वर्षाची वित्तीय स्थिती दर्शविली आहे.

स्थळ : मुंबई — भारताचे नियंत्रण व महालेखापरिक्षक यांचेकरिता व यांचेवतीने.

दिनांक : .०२.२०२१ — सही/-

(हेमा मुन्नीवेंकटाप्पा)

महालेखाकार (लेखा परीक्षा) -II

# जोडपत्र – एक

१) पुरेशी अंतर्गत लेखा परीक्षण यंत्रणा -

अंतर्गत लेखापरिक्षण करण्याची रचना अपुरी आहे. सदर रचनेमध्ये वार्षिक लेख्याशी संबंधीत असलेले दस्ताऐवजच ही लेखीपरिक्षण करण्याचा काम अंतर्गत लेखापरिक्षण खात्याकडून करण्याचा अंतर्भाव करण्याचे गरजेचे आहे. लेखापरिक्षणासाठी सादर केलेले लेखा विविरणपत्र अंतर्गत लेखा परिक्षक यांच्याकडून लेखापरिक्षण करण्यात आलेले नाही.

२) पुरेशी अंतर्गत नियंत्रण यंत्रणा -

महामंडळातील अंतर्गत नियंत्रण यंत्रणा व त्याचे स्वरूप महामंडळाच्या व्याप्तीनुसार पुरेसे आहे.

३) स्थिर मत्तांच्या प्रत्यक्ष पडताळणीची यंत्रणा -

महामंडळामध्ये स्थिर मत्ता निहाय आणि ठिकाण निहाय, नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. महामंडळामध्ये नियमीत अंतराने सर्व स्थिर मालमत्तेची प्रत्यक्ष पडताळणी करण्याची प्रणाली उपलब्ध नाही. मालमत्तेचा ताबा, उपयुक्तता आणि शिर्षक निश्चित करण्यासाठी जमीन आणि बसेसची प्रत्यक्ष पडताळणी केली गेली नाही. स्थापत्य अभियांत्रीकी विभागाद्वारे देखरेख केलेल्या सर्व जमिनी पार्सल आणि इमारतीचे रजिस्टर २००४-०५ पासुन अद्यावत केले गेले नाही आणि वेळोवेळी भार / अतिक्रमण स्थितीचे पुनरावलोकन केले गेले नाही. यंत्र आभियांत्रिकी खात्याकडे गाडयांच्या साठयाबाबत नोंदवही ठेवली आहे.

४) भांडार साठयाच्या प्रत्यक्ष पडताळणीची यंत्रणा -

व्यवस्थापनाने ठरावीक कालावधीनंतर भांडार साठयाची प्रत्यक्ष पडताळणी केलेली आहे. परंतु काही ठिकाणी अशी प्रत्यक्ष पडताळणी कर्मचारी कमतरतेमुळे एकाच व्यक्तीने केलेली असून पडताळणीच्या कामाचे बळकटीकरण आवश्यक आहे.

५) कायद्यानुसार करावयाच्या प्रदानांमधील नियमितता -

आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार महामंडळ निर्विवाद वैधानिक प्रदाने भरण्याबाबत नियमित आहे.

**सही/-**

**वरिष्ठ लेखा परीक्षण अधिकारी**

**(वालेप - ।)**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

जोडपत्र "एक"

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा 31 मार्च 2019 रोजी संपलेल्या वर्षाच्या लेख्यांचा आढावा.

टिप्पणी :- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी लेखा परिक्षण अहवालामध्ये घेतलेले आक्षेप / अभिप्राय या आढाव्यामध्ये घेण्यात आलेले नाहीत.

सन 2018-19 पासुनच मागिल तिन वर्षाचे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे कामकाजचे परिणाम दर्शविणारे विवरणपत्र

rr (आकडेवारी कोटी )

| अनु.क्र. | तपशील | 2016-17 | 2017-18 | 2018-19 |
|---|---|---|---|---|
| 1. | एकुण उत्पन्न (चालन व चालनेत्तर उत्पन्न) | 7056.33 | 7168.00 | 8120.21 |
| 2. | एकुण खर्च (चालन व चालनेत्तर उत्पन्न)* | 7599.90 | 8196.27 | 9068.68 |
| 3. | (अ) वर्षाती नफा/तोटा | (-)543.57 | (-) 1028.26 | (-) 948.45 |
| | (ब) पुर्वकालीन समायोजन | (+) 20.78 | (-)550.41 | (+)8.58 |
| | नक्त जमा (+) | (+) 20.78 | | (+)8.58 |
| | नक्त नावे (-) | | (-)550.41 | |
| 4 | विनियोग/उपयुक्त | | | |
| | अ) घसारा | 325.50 | 243.38 | 274.66 |
| | ब) राज्य सरकारच्या कर्जावरील व्याज | 0.00 | 0.00 | 0.00 |
| | केंद्र सरकारच्या कर्जावरील व्याज | 0.00 | 0.00 | 0.00 |
| | इतर आणि निधी | 2.15 | 4.92 | 1.72 |
| | क) लाभांश वरील शुल्य | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 5 | नक्त नफा/तोटा | (-) 522.78 | (-) 1578.67 | (-) 939.87 |
| 6 | एकुण कामी लावलेले भांडवल आणि गुणतवलेले भांडवल / निव्वळ अभिषेश/व्याज** | (-) 520.63 | (-)1573.75 | (-) 938.16 |
| 7 | परताव्याची टक्केवारी | | | |
| | (अ) कामी लावलेले भांडवल | | | |
| 8. | निव्वळ संपत्ती *** | 5116.99 | 4165.89 | 3972.82 |

* चालन खर्चामध्ये घसारा आणि कर्जावरील व्याज अर्तभाव आहे/ चालनेतर खर्चा भांडवलीच अंतर्गाव आहे.

** निव्वळ नफा/अधिवेष/तूट / तोटा तसेच नफा आणि तोटा खात्यांमध्ये आकारले जाणारे व्याज दर्शविते.*** निव्वळ संपत्ती भांडवल वजा संचित तोटा दर्शवते

<u>जोडपत्र "दोन"</u>

<u>सन 2018-19 पासुनचे मागिल तीन वर्षाचे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची आर्थिक स्थिती दर्शविणारे विविरण पत्र</u>

(आकडेवारी कोटी )

| अनु.क्र. | तपशील | 2016-17 | 2017-18 | 2018-19 |
|---|---|---|---|---|
| अ) | **दायित्वे :** | | | |
| | भांडवल (भांडवली कर्जे व भाग भांडवल समाविष्ट) | 3689.97 | 4184.29 | 4700.60 |
| | सरकारी आणि इतर कर्जे | 312.97 | 318.55 | 373.07 |
| | राखीव निधी व आधिक्य $$ | 459.87 | 516.06 | 587.02 |
| | व्यापारी देणी आणि चालू दायित्वे | 750.75 | 1947.38 | 1933.05 |
| | उपदान व कर्मचारी संबंधीत इतर तरतूदी | 55.08 | 58.65 | 69.04 |
| | **एकूण "अ"** | **5268.64** | **7024.93** | **7662.78** |
| ब) | **संपत्ती व मत्ता :** | | | |
| | स्थिर मत्ता | 3921.20 | 4117.17 | 4263.78 |
| | वजा : घसारा | 3297.61 | 3128.75 | 3288.29 |
| | निव्वल स्थिर मत्ता | 624.04 | 988.42 | 975.49 |
| | चालू भांडवली कामे (चासिसच्या किंमतीसह) | 47.30 | 63.22 | 109.94 |
| | गुंतवणूकी | 1155.04 | 452.07 | 610.59 |
| | चालू मत्ता, कर्ज व आगाऊ रकमा | 1112.26 | 1858.01 | 1363.66 |
| | संचित तोटा | 2330.01 | 3663.21 | 4603.09 |
| | **एकूण "ब"** | **5268.64** | **7024.93** | **7662.78** |
| क) | **कामी लावलेले भांडवल #** | **1032.85** | **962.27** | **294.66** |

**(मुल - महामंडळाच्या वार्षिक लेख्यावरुन)**

$$ घसारा निधी वगळून आणि राखीव व अतिरीक्त आणि भांडवली अनुदानाचा समावेश करुन.

# कामी लावलेले भांडवल, निव्वल स्थिर मत्ता (भांडवली चालू कामे धरुन) अधिक खेळते भांडवल (उपदान तरतूद वगळून ) आहे.

सही/-

(श्री. हरीष त. फुलपाडीया)

वरिष्ठ डीएजी/एएमजी-I

| महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई<br>यांच्या दिनांक 31 मार्च 2019 रोजी संपलेल्या वर्षाच्या वार्षिक लेख्यांवरील<br>भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा स्वतंत्र हिशेब तपासणी अहवाल व त्याची उत्तरे | | |
|---|---|---|
| अनु.क्र. | लेखापरिक्षीत अहवाल | महामंडळाचा खुलासा |
| 1 | 2 | 3 |
| | आम्ही सोबत जोडलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या 31 मार्च 2019 रोजीचा ताळेबंद व त्यासोबत जोडलेल्या नफा-तोटा पत्रक आणि निव्वळ महसूली विनियोजन लेखा यांचे मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम 1950, कलम-33(2) अन्वये लेखा परिक्षण केले. सदर वित्तीय तक्त्यांची जबाबदारी ही महामंडळाच्या व्यवस्थापनाची असून आम्ही केलेल्या लेखा परिक्षणाच्या आधारे त्यावर मत प्रदर्शित करणे ही आमची जबाबदारी आहे.<br>या स्वतंत्र लेखापरिक्षण अहवालात भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी दिलेले अभिप्राय हे केवळ लेखा नोंदीचे वर्गिकरण, सर्वोत्तम लेखानोंदी पध्दती, लेखानोंदणी मानके आणि प्रगटीकरण मानदंड इत्यादी बाबत आहेत. वित्तीय घडामोडीत कायदे पालन, नियम, व अधिनियम (मालकी व नियामक) आणि कार्यक्षमता व कामगिरी इत्यादि संदर्भात काही लेखा निरीक्षणे असल्यास त्याचे परिक्षण अहवाल / भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा लेखा परिक्षण अहवाल स्वतंत्रपणे देण्यात येतात.<br>आम्ही सध्या भारतामध्ये स्विकृत असलेल्या लेखा परिक्षणाची मानके यानुसार लेखा परिक्षण केले आहे. सदर मानकांप्रमाणे लेखा परिक्षणाच्या कामाच्या नियोजन व अंमलबजावणीमध्ये वित्तीय तक्त्यांमधील महत्वाच्या त्रुटी टाळण्यासाठी सर्वसाधारण काळजी घेणे आवश्यक आहे. लेखा परिक्षणामध्ये वित्तीय तक्त्यामधील रकमांच्या समावेशांचे पुरावे काही प्रमाणात तपासण्याचा समावेश होतो. लेखा परिक्षणामध्ये लेखा मानकांच्या अंमलबजावणीची तपासणी व वित्तीय तक्त्यांची मांडणी तपासणे याचाही समावेश होतो. आमच्या समजुतीनुसार | तथ्थात्मक माहिति |

| | | |
|---|---|---|
| | आमचे लेखा परिक्षण मत व्यक्त करण्यास पुरेसा आधार आहे. लेखा परिक्षणाच्या आधारे खालील दाखला देण्यात येत आहे.<br>i) आमच्या माहीतीनुसार लेखा परिक्षणास आवश्यक असणारी माहिती व त्याबाबतचे खुलासे आम्हास प्राप्त झालेले आहेत.<br>ii) या दाखल्याशी संबंधीत महामंडळाचा ताळेबंद व नफा – तोटा पत्रक, मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम 1950, कलम–33(1) नुसार राज्य शासनाने भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्याशी सल्लामसलत करुन ठरविलेल्या नमुन्यात तयार करण्यांत आलेले आहेत.<br>iii) आमच्या मते महामंडळाच्या लेख्यांच्या पुस्तकांची तपासणी केली असता असे आढळुन आले आहे की, मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम 1950, कलम 33(1) बाब क्र. IV व V नुसार महामंडळाने लेख्यांची पुस्तके व इतर कागदपत्रे (रेकॉर्डस) व्यवस्थितरित्या ठेवण्यात आलेले आहेत.<br>iv) पुढे असे नमूद करण्यात येते की, | |
| 1. | मार्ग परिवहन महामंडळ कायद्याच्या कलम 23(3) अनुसार ”राज्य शासन निश्चित करेल त्यानुसार महामंडळाचे अधिकृत भांडवल समभाग विभागले जाईल आणि राज्य शासनाला केंद्र शासनाला तसेच इतर पक्षांना (यामध्ये ज्यांचे उपक्रम महामंडळाने अधिग्रहित केले आहेत अशा लोकांचा देखील समावेश आहे.) यापैकी किती समभाग संख्या देण्यात येईल हे राज्य शासन निश्चित करेल. रु.1341.20 कोटीचे साधारण भागभांडवल राज्य शासन आणि रु.56.77 कोटी केंद्र शासनाने दिलेले आहे. परंतु महामंडळाने अजुनही समभागांचे वितरण केल्याचे समभाग प्रमाणपत्र जारी केलेले नाही. परंतु त्याचा आदेशान्वये पाठपुरावा करण्यात आला नाही जेणे करुन | असे विधान करण्यात आले आहे की, मार्ग परिवहन महामंडळ कायद्याच्या कलम 23(3) अंतर्गतच्या आवश्यकतेन्वये राज्य शासनाने अद्याप महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला दिलेल्या समन्याय भाग भांडवलाचे विभाजन समभागांच्या संख्येत केलेले नाही. त्यामुळेच मरामापम ने अद्याप राज्य शासन आणि केंद्रशासनाने त्यांना पुरविलेल्या भांडवलाब÷ल कोणतेही |

| | | |
|---|---|---|
| | महामंडळ राज्यशासनाकडे याबाबत पाठपुरावा करु शकेल. तथापि असे निरिक्षणात आले आहे की समभागांची दर्शनी किंमत निश्चित करण्याकरिता महामंडळाने राज्य शासनाकडे पाठपुरावा केलेला नाही. | समभाग प्रमाणपत्र जारी केलेले नाही. |
| २ | **भांडवली अनुदान (अनुसुची ब-२):₹ 237.10 कोटी**<br>**बसस्थानकाचे आधुनिकीकरण :₹ २१२.68 कोटी**<br>यामध्ये रु.1.15 कोटी (1,14,82,262/-) ही रक्कम समाविष्ट नव्हती जी फेब्रुवारी 2019 मध्ये रा.प. महामंडळास सौचालय बांधणासाठी सीएसआर अंतर्गत बीपीसीएल आणि रा. प. महामंडळ यांच्यातील सामंजस्य करारानुसार मेसर्स भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमीटेडकडून पहिला हप्ता म्हणुन मिळाली होती त्याचा हिशोब विचारात घ्यायला हवा होता. चुकीच्या लेखानोंदीमुळे ₹ 1.15 कोटीने भांडवली अनुदान कमी दाखविण्यात आले व सध्याची मालमत्ता (बॅंक शिल्लक)कमी दिसली. | या टिपणीच्या संदर्भात, असे नमूद केले आहे की बीपीसीएल कॉर्पोरेशनकडून आर्थिक वर्ष 2018-19 मध्ये स्वतंत्र बॅंक खात्यात अनुदान आले. परंतु प्रत्यक्षात एमएसआरटीसी फंड बॅंक खात्यात ते मे 2019 मध्ये हस्तांररित झाले. म्हणुन ते 2018-19 मध्ये नोंद करायची होती. परंतु ते मे 2019 आर्थिक वर्ष 2019-20 मध्ये नोंद केले गेले. त्यामुळे लेखापरिक्षणात केलेली टिप्पणी योग्य आहे, भविष्यात असे प्रकार घडू नयेत याची काळजी घेतली जाईल. |
| 3. | **शासनाकडून मिळणारे भांडवली अंशदान (अनुसुची ब-3) ₹ .3297.44 कोटी**<br>यामध्ये माहे मार्च 2019 ची रक्कम ₹ 41.94 कोटी समाविष्ठ केलेली नाही. त्याऐवजी हि रक्कम शासनास अदा करावयाचे महसुली दायित्व म्हणुन दर्शविली आहे. शासन निर्णयानुसार मार्च 2019 च्या मासिक अहवालानुसार एकुण प्रवासी कर ₹ 77.03 कोटी पैकी रक्कम ₹ 41.94 कोटी (10 टक्के) रक्कम शासनाच्या भांडवली अंशदानाची होती व देय प्रवासी कर ₹ 35.09 कोटी (7.5 टक्के) होता.<br>चुकीच्या लेखानोंदीमुळे ₹ 35.09 कोटीने "धनको (महसुली दायित्व)" वाढीव दिसुन येत आहेत. तसेच "शासनाचे भांडवली अंशदान" कमी दिसुन येत आहे.<br>आर्थिक वर्ष 2015-16,2016-17 व 2017-18 मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती.परंतु त्यावर अद्यापर्यंत सुधारले गेले नाही. | महामंडळाने केलेली कार्यवाही योग्य आहे. सरकारच्या थकीत प्रवासी कर पुढील महिन्यात भरला जाता, म्हणजे मार्च महिन्यात भरलेला प्रवासी कर 30 एप्रिल रोजी सरकारला भरला जाईल. त्यामुळे आर्थिक वर्षाच्या शेवटी, प्रवासी कराचे दायित्व म्हणुन वर्गीकरण करणे आणि किरकोळ धनकोमध्ये त्याचा सामावेश करणे योग्य आहे. अशा विशिष्ट पध्दतींचा अवलंब करण्याची कारणे खालील प्रमाणे आहे.<br>1) शासनाच्या खात्यातील नोंदी आणि महामंडळाच्या खात्यातील नोंदी यांचा ताळमेळ घालण्यासाठी. |

| | | |
|---|---|---|
| | | 2) सवलती ,प्रवासी कर व भांडवली अंशदान यांच्या समायोजनेचा शासन निर्णय प्रसारित करण्यासाठी. |
| 4. | **घसारा निधी (अनुसुचि–ई–) ₹ 3288.29 कोटी**<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ घसारा निधी नियम, 2006 मधील नियम क्र.12 (2009मध्ये सुचित) नुसार घसारा निधीचा केवल मालमत्ता संपादन/पुनर्स्थापना करण्याच्या उद्देशाने उपयोग होतो, उर्वरित निधीची गुंतवणूक विवक्षित संख्यामध्ये (भारतीय विश्वस्त अधिनियम 1950 अधिकृत) किंवा बँकेत जमा करणे आवश्यक होते.<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडाळ नियम 1950 अ.क्र. 30 (ग) प्रमाणे घसारा निधी गुंतवणुकीची आरंभीची शिल्लक, वर्षादरम्यान केलेली गुंतवणूक आणि वर्षाच्या शेवटी असलेली एकुण गुंतवणूक दर्शविणे आवश्यक आहे. महामंडळाने घसारा निधीमधून कधीही गुणंवणुक केली नसुन ती दर्शविली नाही. रस्ता वाहतूक महामंडळ अधिनियम 1950 च्या नियम क्र. 29 नुसार महाराष्ट्र सरकारच्या पुर्व मंजूरीशिवाय, घसारा निधी हा निधीच्या इ बाबीवर वापरण्यात आला आहे.<br>घसारा निधीचा वापर आणि लेख्यांमधील प्रदर्शन वैधानिक तरतूदींनुसार नव्हते.<br>आर्थिक वर्ष 2016-17 व 2017-18 मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती. परंतु त्यावर अद्यापर्यंत सुधारले गेले नाही. | या टिपणीच्या संदर्भात आपणांस कलविण्यात येते की, घसारा निधी नियमावली 1950 च्या तरतुदीनुसार महामंडलने घसारा निधीची नियमावली तयार केलेली आहे. सन 2018–19 मध्ये रु.939.87 कोटी तोटा झालेला आहे. त्यामध्ये रु.274.66 ची घसाराची तरतूद केलेली आहे. त्यामुळे महामंडळाला रोख तोटा असल्यामुळे घसारा निधीची रोख रक्कम गुणतवणुकीचा प्रश्नच उध्दभवत नाही. नियमावलीतील असे नमुद करण्यात आलेले आहे की, महामंडळाला ज्या वर्षात नफा असेल त्यावर्षी लागु करावयाची आहे. त्यामुळे याबाबत राज्य शासनाकडे पाठविण्याची गरज नाही. |
| 5. | **व्यापारासंकुलावरील अधिकमुल्य**<br>**अ) सरकारी जमिनी ₹ 9.89 कोटी**<br>**ब) इतर जमिनी ₹ 62.19 कोटी**<br>महाराष्ट्र शासन निर्णय गृहविभाग (फेब्रुवारी, मार्च 2001) नुसार महामंडळास मालकी हक्काने प्राप्त झालेल्या शासकीय जमिनीचा व्यापारी तत्वावर उपयोग करुन मिळणा–या फायद्यातील शासनाला मिळावयाचा 50 टक्के हिस्सा (अनर्जित रक्कम) | रा.प.महामंडल शासकिय जमिन सरकारने ठरवुन दिलेल्या योग्य त्या दरानुसार रक्कम अदा करुन ताब्यात घेते. त्यामुळे महामंडळाला शासन निर्णय लागु होत नाही. तथापी, महामंडलाने या संदर्भात शासनाकडून मार्गदर्शन मागविलेले आहे. व |

| | | |
|---|---|---|
| | ज्या वर्षात अशा जमिनीचा व्यापारी तत्वावर वापर सुरु होईल तेव्हापासून प्रथम 5 वर्षासाठी बिन व्याजी कर्ज म्हणून शासनाकडून महामंडळाला दिल्याचे दर्शविण्यात यावे. तद्नंतर हे कर्ज महामंडळाने एक रकमी "न फेडल्यास ते व्याजी कर्ज" म्हणुन राहील आणि त्यावर त्यावर्षाच्या कमाल व्याज दराने व्याज देय राहील. महामंडळांने शासनाकडून घेतलेल्या 8 जागांवरती जुलै 2003 ते एप्रिल 2010 या कालावधीतील व्यापारी संकुले विकसीत केली आहे आणि त्यापोटी ₹ .7.88 कोटी अधिमूल्य प्राप्त झाले आहे. परंतु वरील शासननिर्णयानुसार शासनास देय होणारे कर्ज निश्चित केलेले नाही तसेच लेख्यांमध्ये याबाबत तरतूद केलेली नाही. याबाबत हे दर्शविणे उचित आहे की, एका प्रकल्पाच्या (मेळा स्टॅण्ड, नाशिक) अनअर्जित उत्पन्न ₹ 2.88 कोटी बाबत ऑक्टोबर 2011 मध्ये नाशिक जिल्हाअधिकारी कार्यालयाने मागणी केली होती परंतु सदर रक्कम अदा करण्यात आली नाही अथवा याबाबत वार्षिक लेख्यांच्या भाग असलेल्या टिप्पणीमध्ये दर्शविण्यात आलेले नाही.<br>आर्थिक वर्ष 2014-15, 2015-16, 2016-17 व 2017-18 मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती.परंतु त्यावर अद्यापर्यंत सुधारले गेले नाही. | त्याची प्रत सोबत जोडत आहोत.<br>नाशिक मेळा बाबत रा.प.महामंडळाने जमिन ताब्यात घेतांना त्या जमिनीची संपूर्ण किंमत शासनाला अदा केलेली आहे. त्यामुळे शासनास अप्राप्त नफा भरण्याचा प्रश्न उदभवत नाही. यासंदर्भात जिल्हाधिकारी नाशिक व विभाग नियंत्रक नाशिक यांना वेळोवेळी कळविलेले आहे. |
| 6 | तरतूद (परिशिष्ट – इ) :₹ 14.50 कोटी<br>कॉर्पोरेशनने/महामंडळाने व्यापारी लेखा प्रणालीचे अनुपालन केले आणि उत्पन्न आणि खर्च जमा आधारावर नोंदवला. त्यानुसार, कर्मचारी ज्या वर्षात सेवा देतात त्या वर्षासाठी रजा रोखीकरण दायित्वाची तरतूद केली जावी. 31 मार्च 2019 रोजी महामंडळात 1,01,261कर्मचारी होते. तथापि या कर्मचा-यांच्या संचति रजेच्या शिलकीसाठी रजा रोखीकरण दायित्वाची तरतूद महामंडळाने केली नाही. महामंडळाने, त्याऐवजी रजा रोखीकरण खर्चाचा हिशेब केवळ वास्तविक पेमेंटच्या आधारावर केला. महामंडळाने रजा रोखीकरण दायित्वाची गणना संख्याशास्त्रज्ञाने अहवालाद्वारे केली ज्यानुसार दायित्व ₹ .653.84 कोटी आहे. तथापि, संख्याशास्त्रज्ञाने अहवालानुसारचे | महामडळ ठराव क्र.2020:02:04 दि.03.02.2020 नुसार रजा रोखीकरण्याच्या दायित्वयाबाबत वार्षिक लेख्याच्या भाग असलेल्या टिपणी दाखविण्यात बाबत मंजुरी दिलेली आहे. सदर ठराव सोबत जोडण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | दायित्व देखील आर्थिक विवरणांमध्ये नोंदवले गेले नाही. यामुळे वर्षातील तरतूदी, खर्च आणि तोटा ₹ .653.84 कोटी इतका कमी नोंदवला गेला. तसेच त्या प्रमाणात संचित तोटाही कमी नोंदवला गेला. | |
| 7 | किरकोळ धनको<br>महसुली दायित्वे :- 1675.09 कोटी<br>यामध्ये कर्मचा-यांच्या वेतन थकबाकीच्या ₹ 977.18 कोटीचा समावेश आहे. (पगाराची थकबाकी ₹ 938.63 कोटी जुलै ते सप्टेंबर 18 पर्यंतची महागाई भत्ता थकबाकी ₹ 12.30 कोटी, जानेवारी ते मार्च 2019 पर्यंतची महागाई भत्त्याची थकबाकी रु.18.45 कोटी आणि ऑक्टोबर 18 ते मार्च 19 पर्यंतची अधिका-याची सुधारीती वेतनची थकबाकी रु.7.80 कोटी) अंदाजे ंनोंदवलेल्या आधारावर आणि कर्मचा-यांच्या तपशीलवार सुचीद्वारे बनवलेले नाही. अशाप्रकारे तपशीलवार डेटा उपलब्ध नसल्यामुळे दायित्वाच्या तरतूदीची अचुकता लेखापरिक्षणात निश्चित करता आली नाही. | या टिप्पणीच्या संदर्भात असे म्हटले आहे की, संगणकीकरणाअभावी रा.प. महामंडळामधील बहुतेक कामे हाताने केली जातात. (हस्तलिखित हिशेब नोंदणी) आणि विक्रेद्रीकरणामुळे जवळपास एक लाख कर्मचा-यांचा वेतनाचा तपशील मध्यवर्ती कार्यालय स्तरावर ठेवणे कठीण आहे. म्हणुन डिसेंबर 2008 मध्ये अदा केलेल्या वेतनाचे दर आणि वाढ झालेली महागाई भत्याच्या आधारे 2016-20 या कालावधीसाठी वेतन सुधारणेसाठीची तरतूद मोजण्यासाठी विचारात घेतलेली गृहीतके तांत्रिकतृष्ट्या बरोबर आहेत. |
| 8. | बँकांतील शिल्लक व रोकड शिल्लक<br>(ओव्हरड्रॉन किंवा क्रेडीट बॅलन्स)<br>स्टेट बँक ऑफ इंडीया : 121.37 कोटी<br>यामध्ये एसबीआय मुकुंदवाडी-शाखेतील रु.37.49 लाख क्रेडिट शिल्लक सामाविष्ट आहे. तथापि, बँक स्टेटमेंटनुसार शिल्लक रु.19.31 लाख (पॉझिटीव्ह बॅलन्स) होती.अशा प्रकारे रु.18.18 लाखांचा फरक येत आहे. मध्यवर्ती कार्यशाळा, औरंगाबाद ने ही विसंगती स्पष्ट करण्यासाठी बँक मेळ विवरणपत्र तयार केले नव्हते. 2016-17 पासूनच्या लेखापरिषणाव्दारे बँक शिल्लकीच्या हिशोबातील तफावर निदर्शनास आणुन दिलेली असली तरी, मध्यवर्ती कार्यशाळा, औरंगाबाद ने बँक शिल्लकीचा मेळ घालण्यासाठी योग्य उपायोजना | सदर आक्षेपबाबत मध्यवर्ती कार्यशाळा, औरंगाबाद यांना दुरुस्ती करण्यात कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार बॅंकेचे ताळमेळ घालण्याचे काम पुर्ण झाले असुन दुरुस्तीची नोंद आर्थिक वर्ष 2019-20 मध्ये सुधारीत लेख्यात करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | केल्या नाहीत. या विसंगतीने असे सुचित केले की लेखा प्रणालीमध्ये अनेक व्यवहारनोंदवले गेले असावेत ज्यामुळे लेखा प्रक्रियेतील/ हिशेबातील नियंत्राविषयीचा कमकुवतपणा उघड येतो. | |
| 9 | **संपत्ती व मालमत्ता**<br>**स्थिर मालमत्ता (अनुसूची 'अ')**<br>**स्थिर मत्ता (स्थुल आकडा 31.07.2019 पर्यंत) ₹ 4263.78 कोटी.**<br>वरील रकमेत 31 इमारती (बस स्थानके, प्रशासकीय इमारती, कर्मचारी वसाहत इत्यादी) चा समावेश नाही बीओटी डेव्हलपर्सनी जुलै 2003 ते मार्च 2017 दरम्यान हस्तांतरित केलेल्या या इमारतीची अंदाजित क्कम **₹** 24.94 कोटी आहे. किंमतीची किंमत आहे. महामंडळाच्या बिल्ड ऑपरेशन आणि ट्रान्सफर (बीओटी) प्रकल्प या धोरणानुसार 30 वर्षाच्या कालावधीत बीओटी विकसकाकडून प्रिमियम संकलित करणे. विकसकाने महानगरपालिकेच्या वैशिष्ट्यांनुसार प्रिमियमची रक्कम रोख स्वरुपात आणि (करारात नमूद केलेल्या इमारी व इतर पायाभूत सुविधांद्वारे ) द्यायची होती.<br>महामंडळाने या मालमत्तांचे (प्रिमीयमच्या बदल्यात दिलेली रक्कम) लेखांकन हिशेब पुस्तकात त्याच्या वाजवी/अंदाजित मूल्यानुसार केलेले नाही. परिणामी, मालमत्ताची नियमीत प्रत्यक्ष पडताळणी होऊ शकली नाही व ही मालमतांवरील नियमात त्रुटी आहे. या मालमत्तेचे तपशीलवार विभाजन विविध श्रेणींमध्ये (उदा. इमारती, फर्निचर, फिटिंग्ज,प्लांट मशिनरी आणि उपकरणे इ.) उपलब्ध नाही. मालमत्तेचे वर्गीकरण न केल्यामुळे या मालमत्तेवरील घसारा प्ररिगणईत करणे शक्य नाही.<br>आर्थिक वर्ष 2016-17 व 2017-18 मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती.परंतु त्यावर अद्यापर्यंत सुधारले गेले नाही. | या टिपणीच्या संदर्भात या मत्ता गणनेशिवायच्या नाहीत परंतु नाममात्र मुल्यांने त्यांची गणना करण्यात आलेली आहे. कारण संबंधित बांधकामाचा खर्च महामंडळाकडून करण्यात आलेला नाही. बांधा, वापरा आणि हस्तांतरीतकरा या कराराचा भाग म्हणुन विकासकाने बांधकाचा खर्च केला असून सदर परिसर महामंडलाला विनामुल्य हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. मत्ताची गणना लेख्यामध्ये केलेली असल्याने त्या नियंत्रणाबाहेर असण्याचा प्रश्न उध्दवत नाही. अन केवळ इमारत ही मत्ताच विनामूल्य असल्याने त्यांचे इतर मत्ता श्रेंणीमध्ये वर्गवारी करण्याचा प्रश्नच उध्दवत नाही. संबंधित मत्तांची गणना अगदी नाममात्र मुल्याने केलेली असल्याने त्यांच्या घसारा मुल्याची गणना केलेली नाही. |

| | | |
|---|---|---|
| 10 | यामध्ये ₹ 308.92 कोटीच्या कच्चा इमारतींचा समावेश आहे (लेखाशिर्ष क्र.8,8अ आणि 8क) त्यात 2018-19 वर्षी ₹ .32.78 कोटीच्या स्थिर मतामध्ये भर पडली आहे. स्थिर मत्तेत अशी वाढ दर्शविणा-या प्रमाणकांची (वाऊचरांची) तपासणी केली असता लक्षात आले की, ही सर्व भर नियमीत दुरुस्त्या/विशेष दुरुस्त्या /फेरबदल/रंगकाम/वायरींग इत्यादी प्रकारची काम भांडवली खर्च स्वरुपाची नाहीत आणि त्यांचे ''कच्चा इमारती' असे वर्गीकरण करता येणार नाही.<br>महामंडळाने ''कच्ची बिल्डींग आणि पक्की बिल्डींग'' मधील फरक स्पष्टपणे परिभाषित केला नाही किंवा ''स्थिर मत्ता'' म्हणुन विचारात घेण्यासाठी खर्चाची किमान मर्यादा निश्चीत केली नाही.''स्थिर मत्त्यामध्ये नियमीत आवर्ती दुरुस्तीच्या खर्चाचा समावेश केल्यामुळे ''स्थिर मत्ता रु.32.78 कोटीने अधिक दाखवली गेली आणि त्याच प्रमाणात वर्षासाठीचा खर्च आणि तोटा तसेच संचित तोटा कमी दाखवला गेला.<br>आर्थिक वर्ष 2017-18 मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती.परंतु त्यावर महामंडळाकडन अद्यापर्यंत कच्चा इमारती व स्थित मालमतेबाबतची काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. | स्थापत्य अभियांत्रिकी खर्चाच्या वर्गीकरणाची मानके महामंडळाचे स्थापत्य अभियांत्रिकी विभाग निश्चित करतो. लेखा परिक्षकांची टिप्पणी स्थापत्य अभियांत्रिकी विभागाला अग्रेषित करण्यात आलेली आहे आणि विद्यमान मानकांचे पुररिक्षण केल्यास त्यांची अंमलबजावणी उचित वेळेत करण्यात येईल. |
| 11 | यामध्ये साक्री येथील 22,000 मीटर m² इतक्या भूखंडाचा समावेश आहे (1989 मध्ये रु.3.36 लाखांना विकत घेतलेला होता.) या जमिनीवर एका शैक्षणिक संस्थेने (विद्या विकास मंडल, साक्री (VVMS)) अनधिकृतपणे कब्जा केला होता आणि 765 m² क्षेत्रफळाचे दोन्ही अप्रोच (प्रवेश करण्याचे रस्ते) देखील ब्लॉक करण्यात आले/अडवले होते ज्यामुळे तेव्हापासुन (1989) जमिनीत प्रवेश ंनाकारण्यात आला होता. ताळबंदाच्या तारखेला हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. परंतु महामंडळाला जमिनीवर प्रवेश आणि नियंत्रण ंनव्हते आणि हे योग्य नोंदणीव्दारे दाखवायला हवे होते. महामंडळाच्या अभियांत्रीकी विभागाने 2004-05 | सदर आक्षेपाबाबत कळविण्यात येते की, अशा प्रकाच्या बाबींबाबत वार्षिक लेख्याच्या भाग असलेल्या टिपणीत मुद्या क्र.11 मध्ये दर्शविली जाते. |

| | | |
|---|---|---|
| | पासुन त्यांची जमीन धारण नोंदवही अद्ययावत केली नाहीये आणि जमीन अतिक्रमणाच्या घटना आर्थिक विवरणपत्रांमध्ये उघड केली गेली नाहीत. जमीन धारणा नोंदवही आणि ठराविक कालाने केल्या जाणा-या भौतिक पडताळणीच्या अनुपस्थितीत , अशा घटनांची नोंद न होण्याची शक्यता नाकारता येत नाही. | |
| 12 | **चालु मालमत्ता**<br>**उच्चल आणि ठेव**<br>महामंडळाच्या प्रचलित लेखा धोरणानुसार सात कार्यकारी अभियंता कार्यालयाचे बँकेचे व्यवहार (खर्च/जमा) संबंधीत विभागीय कार्यालयाकडुन सी.इ. सस्पेन्स लेखाशिर्षातुन लेखांकित केल्या जातात त्यानंतर कार्यकारी अभियंता कार्यालयाकडुन सी.इ. सस्पेन्स लेखाशिर्षातील रक्कम योग्य लेखाशिर्षास दर्शविली जाते. तथापि, 31.03.2019 रोजी सी.इ. सस्पेन्स लेखाशिर्षामध्ये शिल्लक रकमेपोटी ताळमेळ नसल्यामुळे ₹ 2.85 कोटी (कार्यकारी अभियंता, औरंगाबाद, नांदेड, आणि पुणे ) आणि जमा असलेली शिल्लक रु.2.18 कोटी (कार्यकारी अभियंता,नागपुर,मुंबई,नाशिक आणि अमरावती) दिसुन येत आहे, तसेच रु.0.67 कोटी (रु.2.85 कोटी – रु.2.18 कोटी) चे ताळमेळ घालने गरजेचे आहे.<br>आर्थिक वर्ष 2015-16, 2016-17 व 2017-18 मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती.परंतु त्यावर अद्यापर्यत सुधारले गेले नाही. | आपणांकडून घेतलेला लेखा आकक्षेप योग्य आहे. सी. ई सस्पेंस लेखाशिर्षचा ताळमेळ घालण्याची सतत ची प्रक्रीया आहे. या खात्याचे पत्र क्र. रा/लेखा/नोंदणी/2703 दि.18.11.2019 नुसार ताळमेळ घालण्याबाबत सर्व कार्यकारी अभियंतांना देण्यात आलेल्या आहेत. |
| 13 | **इतर ऋणको : 908.84 कोटी**<br>यामध्ये 1979-80 ते 2015-2016 या कालावधीतील व्यावसायिक आस्थापनांकडून मुळ देय रक्कम रु.23.26 कोटी (रु.23,25,63,281) इतकी सामाविष्ट आहे. यामध्ये रु.25.94 कोटी (रु.15,93,74,280) हे मुख्य उत्पन्न देखील सामाविष्ट आहे जे 1981-82 ते 2015-16 या कालावधीशी संबंधित खाजगी पक्षकारांकडून | सर्वसामान्यपणे स्वीकृत लेखा तत्वांच्या पुराणमतवादी तत्व हे लेखाकंनातील अशी संकल्पना आहे जी जेवढ्या लवकर शक्य आहे तेवढ्या लवकर निश्चित किंवा अनिश्चित स्वरुपानचे |

| | | |
|---|---|---|
| | (चांगले कर्ज मानले गेलेले) मिळालेले नाही. गेल्या अनेक वर्षापेक्षा जुन्या दाव्यांची वसुली होणे अतिशय कठीण आहे हे लक्षात घेता रु.49.20 कोटींच्या बुडीत कर्जाची तरतूद असायला हवी होती. तीन वर्षापेक्षा जुन्या अशा थकवाकीदारांच्या व्यवहाराची नोंद ठेवण्यासाठी महामंडळात कोणतेही विहित धोरण नव्हते. यामुळे "इतर ऋणको" रु.49.19 कोटींनी जास्त दिसत आहे आणि तेवढ्या प्रमाणात वर्षासाठी खर्च आणि तोटा कमी नोंदवला जात आहे. हे 2017-18 साठी एसएआर (वैधानिक लेखापरीक्षण अहवाल/स्टट्युटरी लेखापरीक्षीत अहवाल) मध्ये देखील निदर्शनास आणले होते. परंतु ते अद्याप पर्यंत सुधारण्यात आलेले नाही. | खर्च आणि दायित्वे ओळखून त्यांची नोंद करते, परंतु वसूली होण्याची खातरजमा असेल तर महसूल आणि मत्ता आहे असे निश्चित करते. महामंडळाला किरकोल ऋणको अंतर्गत वैध कारणाने आणि दाव्यांच्या आधारे विविध शीर्षाअंतर्गत प्राप्त होऊ शकणा-यांना प्राप्त म्हणुन ओळखते. त्यामुळेच जो पर्यंत महामंडळाची संबंधित लेखांकन घटक निश्चित वास्तविक कारणाने या संकिर्ण ऋणकोंना बुडीत आणि संशयीक ऋण मानीत नाही तो पर्यंत संकिर्ण ऋणको अंतर्गत प्राप्त असल्याचा दावा केलेले वसूल होणार आहेत. न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या प्रकरणांचा नियमीत पाठपुरावा करण्यात येत आहे आणि महामंडळ त्यावर उल्लेखनीय खर्च करीत आहे. यावर करण्यात येणारा खर्च, दावे वसूल करण्यातील विश्वास प्रदर्शित करतो. या ऋणाबाबत एकसारखेच धोरण ठेवणे शक्य नाही कारण प्रत्येक प्रकरणाचे वास्तव विभिन्न आहे. या उपर बुडीत आणि |

| | | |
|---|---|---|
| | | संशयीक रुणाची निश्चिती कालाधारीत असेल आणि आयसीएएल ने जारी केलेल्या कोणत्याही लेखाकंन मानकामध्ये निर्देशित केलेले नाही. |
| 14 | तिकीट ट्रे गहाळाचे (₹ 16.44 लाख), खाजगी एजंटकडून नुकसान/ रक्कम महामंडळास न भरल्याचे (₹ .97.17 लाख), चोरी/ दरोड्यातील रोकड हरवणे (₹ .74.33 लाख) आणि वाहकाच्या रोकड रक्कमेमधील लागलेले तुटीचे (₹ 19.23 लाख) व स्वाईप मशिने लागलेली तुट (₹ 43.23 लाख) असे एकुण ₹ 2.50 कोटीचा अंर्तभाव वरील रकमेत आहे. वरील सर्व गहाळ/चोरी/तूट इत्यादी रकमा नियमित येणे प्राप्त खाते म्हणुन वर्गीकरण केले जाऊ शकत नाहीत. प्रचलित लेखा मानांकनानुसार वरील सर्व नुकसानांच्या रकमांची तरतूद करणे आवश्यक आहे. महामंडलाच्या लेख्यात तरतूद न केल्यामुळे ₹ 2.50 कोटीने इतर ऋणको जास्ती झाल्याचे दिसुन येत आहे व महामंडळाचा तोटा व संचित तोटा कमी झालेला आहे.<br>आर्थिक वर्ष 2016-17 व 2017-18मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती. परंतु त्यावर अद्यापर्यंत सुधारले गेले नाही. | महामंडळाच्या वार्षिक लेख्यामध्ये मंजुर केल्यानुसार विविध लेखाशिर्षातंर्गत प्राप्य किंवा वसुल करण्यासंबंधित ₹ .2.50 कोटी रक्कम ढोबळ मानाने किरकोल ऋणको या श्रेणीमध्ये मांडण्यात आलेला आहे. लेखा शीर्ष ६१९ अंतर्गत असलेले वाहक तुटवडा न परतावा किंवा कमी परतावा यामुळे याबाबत तपास/चौकशी होणे आवश्यक आहे आणि त्यांच्या वसूली पूर्वी अथवा बुडीत असे घोषित करण्यापूर्वी त्याची दायित्व निश्चिती होणे आवश्यक आहे. महामंडळाच्या शिस्त आणि अपील प्रक्रियेच्यातंर्गत तिकीट ट्रे (लेखा शीर्ष ६१९ पी) गहाळ होण्यातून झालेल्या तोट्याबाबतही दायित्व निश्चित करण्याची आवश्यकता आहे. लेखा शीर्ष ६१९-आर अंतर्गतची मोठी रक्कम मुंबई विभागाच्या |

| | | |
|---|---|---|
| | | खाजगी आरक्षण अभिकर्त्यांनी कमी परताव्या संदर्भातील आहे. या प्रकरणांचा न्यायालयामध्ये अद्याप निकाल लागणे बाकी आहे. राज्य परिवरहनाच्या रोकड रक्कमेची चोरी/ दरोडा प्रकरणी संबंधित विभागांनी पोलीसांत तक्रार दाखल केलेली आहे, याबाबत एकतर तपासकार्य सुरु आहे किंवा न्यायालयातून निवाड्याची प्रतिक्षा होत आहे. लेखाशीर्ष ६१९-डब्ल्यू मधील त्रूटी तात्पुरत्या स्वरुपाच्या आहेत कारण टी+१ आधारे रक्कम प्राप्त होते. यामुळेच या लेखा शीर्षातील अखेरची शिल्लकीत पुढील आर्थिक वर्षात बँकेत रक्कम जमा केल्याचा व्यवहार प्रतिबिंबीत होत आहे. वरील तथ्यांचा विचार करता, महामंडळाच्या संबंधित लेखाकंन एककांनी ’ बुडीत’ आणि ’ साशंक’ असे वर्गीकरण केल्यामुळे, केवळ त्या आधाराने हे तोटे दर्शविण्यात आलेले आहेत. प्रत्येक प्रकरणाच्या तथ्याच्या आधाराने संबंधीत एकक त्यांच्या वसूली होण्याच्या |

| | | |
|---|---|---|
| | | शक्यतेचे स्वरुप माहित करुन देतात आणि त्यानुसार बुडीत कर्जाच्या तरतुदीची कारवाई करण्यात येते. |
| 15 | **बँक आणि रोकड शिल्लक :– ₹ 176.89 कोटी**<br>**मार्गस्थ रोखड :– ₹ 4.33 कोटी**<br>रु.3.84 यामध्ये महामंडळ ज्याबाबत कोणत्याही प्रकारे अभिलेख नोंदी/हिशेब मेळ विवरणपत्र इत्यादी सादर करु शकत नाही अशी रक्कम म्हणजे मार्गस्थ रोकड होय. गहाळ रक्कम एक वर्षापासुन शोधु शकलेले नाही/सदर रकेमचा ताळमेळ घालता आलेला नाही अशा रक्कमा पुराणमतवादी लेखाकंन तत्वानुसार योग्य तरतूदीची आवश्यकता असते. वित्तीय विधानामध्ये अशा प्रकारे दर्शविलेल्या रोकड रकमेचा तपास करणे/निर्लेखित करणे आवश्यक असते. यामुळे "चालु मत्ता" (रोकड) विधानात ₹ 3.84 कोटाने जास्त झाल्याचे दिसुन येत आहे व महामंडळाचा तोटा व संचित तोटा कमी झालेला आहे.रोकड देखरेखीवरील आंतरीक नियत्रण कमजोर राहिले आहे. | या टिप्पणीच्या संदर्भात, असे सागण्यात येत आहे कि लखाशिर्ष 699 आणि 906 या दोन्हीच्या बाबतीत हिशेबमेळ विविरणपत्र तयार करण्यात आलेले आहे आणि संबंधित विभाग/एककांना पडताळणी आणि स्पष्टीकरणाच्या उ÷शाने अग्रेषीत करण्यात येत आहे. काहीवेळा विभाग चुकून रोजकिर्दीत (जर्नलमध्ये) चुकीच्या किंवा त्रोटक नोंदी करतात. या चुका दुरुस्ती करण्याकरिता मध्यवर्ती कार्यालय पातळीवर लेखाशिर्ष 699 चे हिशेब मेळ विविरणपत्र तयार करण्यात आले आहे आणि या शिल्लकी स्पष्ट करण्याकरिता पाठपुरावा प्रक्रिया सुरु आहे. आपल्या सदर्भाकरिता लेखाशिर्ष 699 च्या हिशेब मेळ विविरणपत्र तयार करण्यात आले असून संबंधित विभागांना दुरुस्तीच्या उ÷शाने सूचित केले आहे. |
| 16 | **बँक आणि रोख शिल्लकः – ₹ 13.08**<br>दोन विभागीय कार्यालयांच्या लेखापरिक्षणामध्ये "हाती असेलेली रोकड" अंतर्गत दर्शविलेली रक्कम शिल्लक ही ₹ 31.98 लाखांनी (धुळे व जळगाव) जास्त दिसुन येत आहे. आगार कार्यालयानी प्रत्यक्ष शिल्लक प्रमाणि करण्या ऐवजी दररोज जमा होणारी रोकड प्रमाणित दररोज जमा होणारी रोकड शिल्लक प्रमाणित केली आहे. प्रत्यक्षात अनधिकृत खर्चाच्या नोंदीमुळे रोकड रकमेत तुट आहे. सर्व विभागीय कार्यालयांमध्ये ही पध्दत असल्याने त्यामध्ये दुरुस्तीची आवश्यकता | आगाराला महसुल उत्पन्न खर्च करण्याची परवानगी नाही. प्रत्येक आगाराला अंदाजित ₹ 6000/– अग्रधन दिले आहे. अशी अपेक्षा आहे की, त्या अग्रधनामधुन सर्व खर्च केले जाईल. तथापी, आगार पातळीवर महत्वाच्या कामासाठी निधी कमी पडल्यास वाहतुक उत्पन्न वापरले जाते. त्यानंतर |

| | | |
|---|---|---|
| | आहे. नमूना तपासणी केल्याने दुरुस्तीची रक्कम परिगणित करता येत नाही व ही चुकीची प्रथा सर्व विभागीय कार्यालयामध्ये सुरु आहे. याबाबत मागील वर्षीही कळविण्यात आले होते.<br>आर्थिक वर्ष 2016-17 व 2017-18 मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती.परंतु त्यावर अद्यापर्यंत सुधारले गेले नाही. | आगाराने खर्च केलेल्या पावत्यांच्या आधारावर विभागिय कार्यालयाकडून वेळोवेळी प्रतिपुर्ति केली जाते. त्यानंतर 31 मार्चला आगार स्तरावर रोख रक्कत परत म्हणुन जोडली जाते व लेखाशिर्ष 771 ला दर्शविली जाते. अशा भरपाईची तरतुद विभागिय कार्यालयाकडून केली जाते. |
| 17 | इतर विविध खर्च : ₹ 92.54 कोटी<br>वरील खर्चामध्ये कॅश पिक अप एजंटचे ₹ 0.66 कोटी (₹ 65,46,846) ची नोंद घेण्यात हवी होती, परंतु ती लेखानोंद घेण्यात आलेली नाही.<br>सदर खर्चाची तरतूद न केल्यामुळे वर्षभरातील दायित्व खर्च, तोटा व सचिंत तोटा ₹ 0.66 कोटीने कमी झाला आहे. | आपणांकडून घेतलेला लेखा आकक्षेप योग्य आहे. अशा प्रकारच्या चुका भविष्यात पुन्हा होणार नाही याची दक्षता घेतली जाईल. |
| 18 | **उत्पन्न**<br>**चालन उत्पन्न**<br>**प्रवाशांकडून उत्पन्न :- रु.7778.87 कोटी**<br>यात रु.77.29 कोटी (रु.77,28,56,049) ची रक्कम सावाविष्ट आहे जी 'अपघात सहायता निधी फंड (लेखाशिर्ष क्र.572-A) मधुन 2018-19 मधील 180 दुष्काळग्रस्त तालुक्यातील विद्यार्थ्याना मासिक पासवर सवलत/महसुल माफ म्हणुन हस्तांतरित करण्यात आली होती. हे हस्तांतरण निधीचे व्यवस्थापन करणा-या विश्वस्त मंडळाच्या मंजुरीशिवाय करण्यात आले. मंडालाने (डिसेंबर 2018) बुडालेल्या उत्पन्नाच्या नुकसानाची भरपाई करण्यासाठी विश्वस्त मंडळाशी संपर्क साधण्याचा निर्णय घेतला होता. पण तो अंमलात आणला गेला नाही. विश्वस्त मंडळाच्या ऑब्जेक्ट क्लॉजने (objects clause) त्याच्या निधीच्या अशा वापरास परवानगी दिली नाही. विश्वस्त मंडळाकडून वाहतूक महसूलाची भरपाई करण्यासाठी निधी वापरण्याची परवानगी नसताना, हस्तांतरणाच्या मार्गाने उत्पनांची नोंद अनधिकृत होती. यामुळे उत्पन्न रु.77.29 कोटींचा जास्त दाखवला गेला | या टिप्पणीच्या संदर्भात, तुम्हाला खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.<br>1) अपघात सहाय्यता निधीसाठी स्वतंत्र विश्वस्त संस्थेची नोंदणी दि.27.11.2018 पासुन धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्याकडे करण्यात आली आहे.<br>2) महाराष्ट्र शासनाने दि.01.04.2016 पासुन अपघात सहाय्यता निधी विश्वस्त संस्थेला मंजुरी दिलेली आहे.<br>3) अपघात सहाय्यता निधीतुन येणारी मिळकत आणि खर्चाचा हिशेब विश्वस्त संस्थाच्या स्वतंत्र लेखापुस्तकात ठेवण्याचे काम चालु आहे.<br>हिशेबाच्या प्रक्रियेदरम्यान, विश्वस्थ मंडळाच्या वापरासाठी प्रलंबित मंजु-या मिळवल्या जातील आणि सर्व |

| | | |
|---|---|---|
| | आणि 'वर्षासाठीचा तोटा तसेच संचति तोटा' तेवढ्या प्रमाणात कमी दाखवला गेला. | आवश्यक परतावे धर्मादाय आयुक्त कार्यालयात दाखल केले जातील. हे काम लवकरच पुर्ण होण्याची शक्यता आहे. |
| 19 | **कमकुवत अंतर्गत नियंत्रण**<br>महामंडळाने विभागीय नियंत्रकांचे कार्यालय, मध्यवर्ती कार्यशाळा आणि कार्यकारी अभियंता कार्यालय इत्यादीचा समावेश असलेल्या 43 शाखा कार्यालयामधून आलेल्या वित्तीय माहितीच्या आधारे वित्तीय विधान संकलित केले आहे. आमच्या असे निरिक्षणात आले आहे की " अंतर्गत लेखापरिक्षण विभाग" असा स्वतंत्र नियंत्रक विभाग असून तसेच विभागातर्फे नियमितपणे सर्व शाखा कार्यालयाची वार्षिक तपासणी होत असूनही शाखा कार्यालयातील लेखा माहितीचे लेखापरिक्षण करण्यात आलेले नाही. यामुळे अंतर्गत नियंत्रण कमकुवत होते आणि त्यामुळे चुकीच्या नोंदी, चुकीचे वर्गीकरण, मुद्रांकन त्रूटी इत्यादी कमतरता वार्षिक लेख्याचे संकलन करतांना मध्यवर्ती कार्यालयाला लक्षातही येणार नाहीत.<br>आर्थिक वर्ष 2016-17 व 2017-18 मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती.परंतु त्यावर अद्यापर्यंत सुधारले गेले नाही. | 1)महामंडळाकडे 10 लेखापरिक्षक संघासह अंतर्गत लेखापरिक्षण शाखा आहे. या संघांना प्रत्येक वित्तीय वर्षाकरिता वर्षातून काही निवडक महिने व्यवहाराचे तसेच त्यासह उप खातेवही,नियंत्रण लेखा इत्यादींचे लेखापरिक्षणाचे कार्य देण्यात आलेले आहे.<br>२) चुकीच्या नोंदी,चुकीचे वर्गीकरण,मुद्रांकंन त्रूटी इत्यादींना प्रतिबंध करण्याकरिता मध्यवर्ती कार्यालयातील लेखा विभागाच्या नोंदणी शाखेकडून खाली दिलेल्या विविध पध्दतीव्दारे देखरेख करण्यात येतेः<br>i)दरमहा डी फॉर्म/तेरीज चे प्रिंटटाऊट तपासणीकरण्यासाठी घटकाकडे पाठविले जातात.<br>ii) समरी डि फॉर्म प्रिंटटाऊटची लेखाशिर्षनिहाय तपसणी करुन त्रूटींबाबत घटकांना कळविले जाते.<br>iii) स्थानिक सर्वसाधारण खातेवहीसोबत पडताळणीकरीता सर्वसाधारण खातेवही लेख्याचे प्रिंटआऊट पाठविण्यात येतात.<br>वरील पध्दती मोठ्या प्रमाणात लेखाकंन विसंगतींना प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने कार्य करते. अंतर्गत लेखापरिक्षण |

| | | |
|---|---|---|
| | | संघ देखील व्यवहारांच्या लेखापरिक्षणांसह अशा निरीक्षणांना नोंदविण्याकरीता मुक्त असते परंतु हे पैलू त्यांच्या तपास सूचीमध्ये समाविष्ट करण्याची काही आवश्यकता नाही, विशेषतः वर उल्लेखलेल्या लेखा कारणाबाबत तर नाहीच. |
| 20 | सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम 2006 च्या कलम 22 प्रमाणे प्रत्यक्षक खरेदीदाराने त्याच्या वार्षिक लेखांमध्ये सुक्ष्म व लघु उद्योगांना वर्षा अखेरीस देय असलेल्या मुळ रक्कम व त्यावरील व्याज अश्या उद्योगांना प्रत्यक्ष दिलेले व्याज व अश्या उद्योजकास उशिरा करण्यात आलेली प्रदान याची माहिती दर्शविने आवश्यक आहे. तथापि महामंडळाने दि.31.3.2019 रोजी अश्याप्रकारे थकीत असलेल्या रकमा वा त्यावरील व्याजाचे दायित्व लेख्यांमध्ये दर्शविले नसून त्यामुळे उपरोक्त अधिनियमाच्या कलम 27 प्रमाणे आवश्यकती कार्यवाही होऊ शकते.<br>आर्थिक वर्ष 2016-17 व 2017-18 मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती.परंतु त्यावर अद्यापर्यंत सुधारले गेले नाही. | महामंडळाने सुक्ष्म, लघु, आणि मध्यम उद्योग करण्या-या विक्रेत्यांबरोबर मध्यवर्ती कार्यालयाव्दारे दर करार केले असून आदेश आणि अदायगीची प्रक्रिया विकेंद्रित केलेली आहे. म्हणून आवश्यक असणारी माहिती सध्या उपलब्ध झाली नाही. सदर माहिती जमा करुन वार्षिक लेख्याच्या ताळेबंदाला भाग असलेल्या टिपणीमध्ये दर्शविण्यात येईल. |
| 21 | बांधा, विका आणि हस्तांतरीत करा (बिओटी) या योजनेअंतर्गत महामंडळ आपली रिक्त जागा विकसित करीत आहे, ज्यात विकासकांमार्फत तेंतीय पक्षाला व्यापारी संकुलन तयार करण्यासाठी रिक्त जमीन बीओटी-डेव्हलपरकडे 30 वर्षासाठी भाड्याने हस्तांररित केली जाईल. वर्षाच्या लीज कालावधी करिता महामंडळ एकरकमी (स्थगित उत्पन्नाच्या रुपात वर्गीकेंत) अधिमूल्य गोळा करते आणि अधिमुल्य एक तेंतीअंश भाग संपुर्ण 30 वर्षाच्या भाडेपट्टीच्या कालावधीत वार्षिक उत्पन्न म्हणून नोंदविते. बीओटी-डेव्हलपरकडून | महामंडळाने बीओटी सोबत झालेल्या करारानुसार विलंब झाल्यास दंड आकारण्याची तरतुद केली आहे. त्यामुळे वार्षिक लेख्याच्या ताळेबंदाची भाग असलेल्या टिपणीत ठेवणे आवश्यक वाटत नाही.तसेच स्थापत्य खात्याचे पत्र क्र.05/2020 |

| | | |
|---|---|---|
| | व्यावसायिक संकुलाची बांधकाम पूर्ण झाल्यावरच वार्षिक उत्पन्न नोंदविणे योग्य होईल. विकासकाद्वारे प्रकल्प लांबणीवर पडल्यास किंवा अर्धवट सोडल्यास महामंडळाला त्यांचे वार्षिक उत्पन्न व्यावसायिक भाड्याचा कालावधी सुरु न झाल्याने नोंदविता येत नाही. बॅाट डेव्हलपरद्वारे डिफॉल्ट/विलंब झाल्यास महामंडळाचा उत्पन्नाची नोंद चुकीची ठरु शकते जेथे महामंडळ विकासकाच्या विलंब/डिफॉल्टमुळे कोणतेही वार्षिक उत्पन्न नोंदवला जाऊ शकत नाही. आर्थिक वर्ष 2016-17 व 2017-18मध्ये सदर बाब लक्षात आणुन देण्यात आलेली होती.परंतु त्यावर अद्यापर्यंत सुधारले गेले नाही. | दि.20.05.2002 मध्ये दंडा बाबत सुचना आहेत. |
| 22 | आकस्मिक दायित्वांचे (संभाव्यकथित देणी) उघड न करणे<br>महामंडळाने केवळ रस्ते अपघातांशी संबंधित चालू असलेल्या न्यायालयीन खटल्यांच्या बाबतीत आकस्मिक दायित्व (संभाव्यकथित देणी) नोंदवले होते. कर्मचा-यांनी आणि नोकरीसाठी इच्छुकांनी महामंडळा विरुध्द केलेले दावे आर्थिक ताळेबंद आणि संबंधित कागदपत्रांचा भाग असलेल्या टिपणीमध्ये याचा हिशोब आणि त्याची नोंद केली गेली नाही. अशाप्रकारे, आकस्मिक दायित्वाची नोंदीत न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या कर्मचा-यांच्या दाव्यांची नोंद कमी आहे. मध्यवर्ती कार्यशाळा (औरंगाबाद) मधील कर्मचारी विभागाद्वारे देखभाल केलेल्या न्यायालयीन केस रजिस्टरच्या (खटला नोंदवही) आमच्या चाचणीत, आम्ही असे निरीक्षण केले की वेतन, पदोन्नती, वसुली,पुनस्थापना इत्यादी बाबीवर महामंडळाच्या कर्मचा-यांनी आठ न्यायालयीन खटले दाखल केले होते. ज्यांचा खुलासा करण्यात आला नव्हता. | सदर आक्षेपानुसार वार्षिक लेख्याची भाग असलेल्या टिपणीत सदर वार्षिक लेख्यात नमुद करण्यात आलेले आहे. |
| 23 | वार्षिक लेख्याशी भाग असलेल्या टिपणी<br>टिपणी क्र. 22 - बुडीत व संशयीत कर्जासाठी तरतूद<br>बुडीत व संशयीत कर्जासाठी तरतूद या संदर्भातील टिप क्र.22 मध्ये संदर्भाकडे आपले लक्ष वेधण्यात येते, जो खालीलप्रमाणे होता :- | सर्वसामान्यपणे स्वीकृत लेखा तत्वांच्या पुराणमतवादी तत्व हे लेखाकंनातील अशी संकल्पना आहे जी जेवढ्या लवकर शक्य आहे तेवढ्या लवकर निश्चित किंवा अनिश्चित स्वरुपानचे खर्च आणि दायित्वे ओळखून |

<table>
<tr>
<td></td>
<td>"महामंडळाच्या धोरणानुसार बुडीत व संशयास्पद कर्जासाठी तरतूद विभागांनी दिलेल्या माहितीच्या आधारे तयार केली जाते. बुडीत व संशयास्पद कर्जाच्या तरतूदीशी संबंधित शिल्लक अशा पातळीवर राखली जाते की त्या विशिष्ट आर्थिक वर्षातील संभाव्य खराब आणि संशयास्पद कर्जे सामाविष्ट करता येतील.<br><br>महामंडळाकडे बुडीत व संशयास्पद कर्जाच्या तरतूदीबाबतचे संचालक मंडळाने मंजुर केलेले धोरण नव्हते ज्यात कर्ज/प्राप्तीवरील तरतूद ओळखण्यासाठी अटी ,कर्जाचे वय, भौतिकता(मटीरीअलिटी) इत्यादी स्पष्टपणे नमूद केले असेल. बुडीत कर्जाची ओळख आणि तरतूद सक्षम करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे / धोरण नसताना, विभागीय कार्यालयांनी तरतूदीची आवश्यकता अचुकपणे नोंदवली नाही. अशाप्रकारे टिपणी क्र.२२ मधील खुलासा त्या प्रमाणात वस्तुस्थितीनुसार चुकीचा होता.</td>
<td>त्यांची नोंद करते, परंतु वसूली होण्याची खातरजमा असेल तर महसूल आणि मत्ता आहे असे निश्चित करते. महामंडळाला किरकोळ ऋणको अंतर्गत वैध कारणाने आणि दाव्यांच्या आधारे विविध शीर्षाअंतर्गत प्राप्त होऊ शकणाऱ्यांना प्राप्त म्हणुन ओळखते. त्यामुळेच जो पर्यंत महामंडळाची संबंधित लेखांकन घटक निश्चित वास्तविक कारणाने या संकिर्ण ऋणकोंना बुडीत आणि संशयीक ऋण मानीत नाही तो पर्यंत संकिर्ण ऋणको अंतर्गत प्राप्त असल्याचा दावा केलेले वसूल होणार आहेत. न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या प्रकरणांचा नियमीत पाठपुरावा करण्यात येत आहे आणि महामंडळ त्यावर उल्लेखनीय खर्च करीत आहे. यावर करण्यात येणारा खर्च, दावे वसूल करण्यातील विश्वास प्रदर्शित करतो. या ऋणाबाबत एकसारखेच धोरण ठेवणे शक्य नाही कारण प्रत्येक प्रकरणाचे वास्तव विभिन्न आहे. या उपर बुडीत आणि संशयीक रुणाची निश्चिती कालाधारीत असेल आणि आयसीएएल ने जारी केलेल्या कोणत्याही लेखाकंन मानकामध्ये निर्देशित केलेले नाही.</td>
</tr>
<tr>
<td>24</td>
<td>महालेखापाल कार्यालयाने निदर्शनास आणुन दिल्यानुसार व्यवस्थापनाने अलेखापरिक्षीत लेख्यांमध्ये खालील सुधारणा केल्या आहेत.<br>(₹ – कोटीत)<br><table><tr><th>तपशिल</th><th>नावे</th><th>जमा</th><th>नक्त परिणाम</th></tr></table></td>
<td>तथ्यात्मक माहिती</td>
</tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| उत्पन्न | 6.04 | 0.00 | 6.04 |
| खर्च | 41.92 | 0.00 | 41.92 |
| मत्ता | 0.03 | 9.82 | 9.79 |
| दायित्व | 0.00 | 39.31 | 39.31 |

लेखा टिप्पणीच्या नक्त परिणामामुळे (1) मत्तेमध्ये ₹ 9.79 कोटीची घट झालेली आहे. (2) दायित्वांमध्ये ₹ 39.31 कोटीची वाढ झालेली आहे. (3) खर्चामध्ये ₹ 41.92 कोटीची वाढ झालेली आहे.(4) उत्पन्नात ₹ 6.04 कोटीने घट झालेली आहे.

| | | |
|---|---|---|
| | V) आधीच्या परिच्छेदामध्ये देण्यात आलेल्या निरिक्षणात्मक मुद्यांच्या अधिन राहुन आम्ही असा अहवाल देत आहोत की ताळेबंद व नफा – तोटा पत्रक, कामकाजाच्या पुस्तकांशी जुळत आहे.<br>VI) आमच्या माहीतीनुसार व आम्हास सादर केलेल्या खुलाश्यानुसार सदर आर्थिक तक्ते व लेख्यांचे धोरण व लेख्यासोबत जोडलेली टिप्पणी, उपरोक्त अहवालात नमुद केलेल्या महत्वाच्या मुद्यांच्या अधीन राहून व सोबत जोडलेल्या जोडपत्र "एक" नुसार सदर वार्षिक लेखे भारतामध्ये सर्वसाधारपणे स्वीकृत केलेल्या लेखा मानकांप्रमाणे महामंडळाची सत्य व वास्तविक स्थिती दर्शवितात. | तथ्यात्मक माहिती |
| | अ) ताळेबंदात महामंडळाची दि. 31-03-2019 ची सत्य व वास्तविक स्थिती दर्शविली आहे व<br>ब) नफा- तोटा पत्रकात, त्या तारखेस संपलेल्या आर्थिक तोटयाची सत्य व वास्तविक स्थिती, दर्शविली आहे.<br>जोडपत्र "दोन" मध्ये लेख्याचा आढावा घेतल्यानंतर एकत्रित तयार केलेली महामंडळाची गेल्या तीन वर्षाची वित्तीय स्थिती दर्शविली आहे.<br>स्थळ : मुंबई | तथ्यात्मक माहिती |

| | | |
|---|---|---|
| | भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेकरीता व यांचेवतीने.<br><br>दिनांकः–    .02.2021<br>सही/–<br><br>(हेमा मुन्नीवेंकटाप्पा)<br>महालेखाकार ( लेखा परिक्षा )–II | |

Comment No- 6

**दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२० रोजी दुपारी १२.०० वाजता मंत्री परिवहन संसदीय कार्ये, यांचं कार्यालयीन दालन (५०३ मुख्य), महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई येथे संपन्न झालेल्या म.रा.मा.प. महामंडळ संचालक मंडळाच्या २९१ व्या सभेचे कार्यवृत्त.**

सभेला खालील प्रमाणे उपस्थिती होती.

| | | |
|---|---|---|
| मा.अँड.अनिल परब | : | मा. मंत्री(परिवहन)तथा अध्यक्ष,म.रा.मा.प. महामंडळ |
| मा. श्री. आशिष कुमार सिंह | : | मा.प्रधान सचिव, परिवहन व बंदरे तथा उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक |
| मा. श्री. शेखर चन्ने | : | मा. परिवहन आयुक्त |
| मा.डॉ.महेंद्र कल्याणकर | : | मा.कामगार आयुक्त |
| श्री. श.दा. माईनहळ्ळीकर | : | सचिव, म.रा.मा.प. महामंडळ |

श्री. अशोक फळणीकर, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.श्रीमती इति पांडे, मुख्य वाणिज्य प्रबंधक तथा शासकीय संचालक व मा. श्री. परेश कुमार गोयल, संचालक (परिवहन) नवी दिल्ली तथा शासकीय संचालक हे आपआपल्या कार्यबाहुल्यामुळे बैठकीला उपस्थित राहु शकले नाहीत असे सचिव, म.रा.मा.प. महामंडळ यांनी विदीत केले व मा. परिवहन मंत्री तथा अध्यक्ष, महामंडळ यांच्या परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्र.१** **दिनांक ३० ऑगस्ट, २०१९ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या २९० व्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.**

सचिव, म.रा.मा.प. महामंडळ यांनी दिनांक ३०.०८.२०१९ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या २९० व्या सभेचे कार्यवृत्त सभेसमोर सादर केले. मा. अध्यक्ष महोदयांनी कार्यवृत्तात काही दुरुस्ती आहे काय अशी विचारणा केली. सचिव, महामंडळ यांनी कोणत्याही खाते प्रमुखांनी दुरुस्ती सुचविलेली नाही असे विदीत केले.चर्चेअंती खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**महामंडळ ठराव क्र.२०२०:०२:०१ दिनांक ०३.०२.२०२०**

दिनांक ३०.०८.२०१९ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या २९० व्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास मा. संचालक मंडळाने मान्यता दिली.

**<u>महामंडळ ठराव क्र.२०२०:०२:०३ दिनांक ०३.०२.२०२०</u>**

"सन २०२०-२१ या वर्षाचे महसूली व भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०१९-२० चे सुधारित महसूली व भांडवली अंदाजाचे प्रस्ताव विचारात घेऊन अर्थसंकल्पीय अंदाजास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली."

**<u>बाब क्र.४</u>: महामंडळाचे सन २०१८-१९ चे अलेखापरीक्षित वार्षिक लेखे.**

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी महामंडळाच्या सन २०१८-१९ च्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षाप्रमाणे महामंडळास रु.८७९.३५ कोटींचा तोटा झालेला असून त्यामध्ये रु.७.१३ कोटीचे पूर्वकालीन समायोजन अधिक केल्यानंतर महामंडळास सन २०१८-१९ मध्ये रु.८८६.४८ कोटींचा नक्त तोटा झालेला आहे. जून २०१८ पासून १८ % भाडेवाढ व [illegible] कि.मी.मधील ०.४१ लाखाने वाढ केल्यामुळे मागील वर्षापेक्षा चालन उत्पन्नात रु.९[illegible] कोटींची वाढ झाली आहे. व चालनेत्तर उत्पन्नात रु.६.१४ कोटींनी घट झाली आहे. [illegible] हे घट [illegible] वाहनांची व मालाच्या विक्री मध्ये तसेच व्याजामध्ये घट झाल्यामुळे आहे. चर्चेअंती खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**<u>महामंडळ ठराव क्र.२०२०:०२:०४ दिनांक ०३.०२.२०२०</u>**

महामंडळाच्या सन २०१८-१९ च्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षाची नोंद संचालक मंडळाने घेवून तसेच कर्मचाऱ्यांच्या रजा रोखीकरणाची तरतूद वार्षिक लेख्यांमध्ये न करता ती टिपणीमध्ये नमुद करण्यास,उपदान निधी विश्वस्त मंडळाच्या दायित्वाची तरतुद प्रत्यक्ष खर्च पध्दतीने टिपणीमध्ये नमुद करण्यास तसेच घसारा निधीच्या [illegible] ठेवण्यास व नियमाप्रमाणे दायित्व टिपणीमध्ये नमुद करण्यास तसेच गुंतवणूकीबाबत शासकिय लेखा परिक्षणास अवगत करण्यास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली.

**<u>बाब क्र.५</u>: महामंडळाकडून होणाऱ्या निधीच्या गुंतवणूकीची माहिती.**

वित्तिय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी महामंडळाकडून माहे ऑगस्ट ते डिसेंबर २०१९ या कालावधीत केलेल्या अल्प मुदतीच्या गुंतवणूकीची माहिती दिली. चर्चेअंती खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

Comment No-5

76

दूरध्वनी : 23023900

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई :400008

क्र. राप / स्थाअ / व्या.सं-जी./ अन-हिस्सा / 1839 दिनांक : 18 . 04.2018.

प्रति,

कक्ष अधिकारी,

गृह विभाग, महाराष्ट्र शासन,

मुंबई . 400032.

**विषय :** राज्य परिवहन महामंडळाच्या ताब्यातील जमिनींचा व्यापारी प्रयोजनार्थ उपयोग करणे. अनर्जित रकमेतील शासनास मिळावयाचा 50 % हिस्सा अदा करण्यावाबत.

संदर्भ : क्र. एसटीसी-0218/(प्र.क्र. 121)/परि-1, दि. 28 मार्च 2018.

---

महोदय,

वरील विषयातील संदर्भित पत्रानुसार आवश्यक असलेली माहिती पुढील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

1) ज्या जागांसाठी भोगवटा मूल्याची पूर्ण रक्कम महामंडळाने अदा केली आहे व व्यापारी उपयोग करण्यात येत आहे त्या जागांचा पूर्ण तपशिल.

| अ. क्र. | ठिकाण (संपादनाची तारीख) | क्षेत्रफळ | | व्यापारी उपयोग केव्हापासून | त्यापासून मिळणारा फायदा रक्कम (प्रिमियम रक्कम) रुपये लाख | रक्कम अदा केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | भूखंड (चौ.मी.) | व्यापारी क्षेत्रफळ (चौ.मी.) | | | |
| 1 | मेळास्टॅड-नाशिक 06.5.1950 | 34600 | 8200 | जुलै 2003 | 577.00 | शासन निर्णयामध्य अनर्जित हिस्सा परिगणित करण्याचे सुत्र निश्चित नसल्यामुळे अद्याप रक्कम परिगणित करता आली नाही. व त्यामुळे रक्कम शासनास अदा करता आली नाही. |
| 2 | भंडारा 05.4.1956 | 17879 | 1800 | जानेवारी 2006 | 52.11 | |
| 3 | मानोरा 11.6.2001 | 5199 | 800 | एप्रिल 2010 | 30.00 | |
| 4 | लोणी 20.9.1968 | 5463 | 300 | मार्च 2010 | 0.21 | |
| 5 | पंढरपूर 29.10.53 | 34525 | 2000 | मे 2009 | 21.00 | |
| 6 | बुलढाणा 6.10.1965 | 38500 | 2000 | फेब्रुवारी 2010 | 72.72 | |

-2-

2) ज्या जागांच्या बाबतीत भोगवटा मूल्याची रक्कम महामंडळाने शासनास अदा केलेली नाही. तथापि, व्यापारी प्रयोजनार्थ त्यांचा उपयोग करण्यात येत आहे, अशा जागांच्या बाबतीत संपूर्ण तपशील

| अ. क्र. | ठिकाण (संपादनाची तारीख) | क्षेत्रफळ | | व्यापारी उपयोग केव्हापासून | त्यापासून मिळणारा फायदा रक्कम (प्रिमियम रक्कम) रुपये लाख | रक्कम अदा केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | भूखंड (चौ.मी.) | व्यापारी क्षेत्रफळ (चौ.मी.) | | | |
| 1 | पैठण 08.6.1962 | 14100 | 500 | फेब्रुवारी 2006 | 27.51 | शासन निर्णयामध्य अनर्जित हिस्सा परिगणित करण्याचे सुत्र निश्चित नसल्यामुळे अद्याप रक्कम परिगणित करता आली नाही. व त्यामुळे सदरील रक्कम शासनास अदा करता आली नाही. |
| 2 | पलूस 20.6.2009 | 9600 | 250 | मार्च 2011 | 7.34 | |

वरील तक्ता क्र.1 मधील भूखंडांबाबतचे पूर्ण भोगवटा मुल्य शासनास अदा करण्यात आलेले आहे. सबब, **''शासनाला पूर्ण भोगवटा मूल्य देवून महामंडळाने घेतलेल्या जमिनीवरील प्रकल्पांद्वारे झालेल्या फायद्यातील अनर्जित हिस्सा शासनास देय ठरत नाही''**अशी महामंडळाची धारणा आहे.

वरील तक्ता क्र. 2 मधील भूखंड महामंडळास शासनाकडून नाममात्र दराने प्राप्त झालेले आहेत. सबब, अशा भूखंडांवरील व्यापारी संकुल प्रकल्पातून महामंडळास झालेल्या फायद्यातील अनर्जित हिस्सा परिगणित करण्यासाठीचे सूत्र निश्चित करण्यात यावे. शासन निर्णय दि. 01 फेब्रुवारी 2001 मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदरील योजनेचा उद्देश महामंडळाची वित्तीय स्थिती पुन:स्थापित व्हावी तसेच प्राप्त होणा-या महसूलामधून प्रवाश्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात असे अभिप्रेत आहे. सबब, ही बाब विचारात घेऊन फायद्यातील अनर्जित हिस्सा परिगणित करण्यासाठी सूत्र निश्चित करण्यात यावे, ही विनंती.

महाव्यवस्थापक (स्था.अ.)

Comment No - 12

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४००००८.

राप/लेखा/नोंदणी/वा.ले./२०१८-१९/ 2603

दिनांक : १६-११-२०१९ १८

प्रति,

कार्यकारी अभियंता,

प्रादेशीक कार्यालय, औरंगाबाद/मुंबई/नागपुर/पुणे/नाशिक/अमरावती | नांदेड

विषयः- CE Suspense लेखाशिर्षाला शिल्लक रकमांबाबत

संदर्भ :-१) या खात्याचे पत्र क्र.ST/BKG/४१३ दि.१२.१२.१७ (वार्षिक लेखे २०१६-१७)

२) या खात्याचे पत्र क्र.ST/BKG/४९५ दि.२१.१०.१८ (वार्षिक लेखे २०१७-१८)

३) शासकिय लेखा आक्षेप क्र.३ दि.०२.११.१९. (वार्षिक लेखे २०१८-१९)

***

वरील विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, दि.३१.०३.२०१९ पर्यतची CE Suspense लेखाशिर्षची तपासणी केली असता खालील प्रमाणे रक्कम अद्याप पर्यंत शिल्लक दिसुन येत आहे. याबाबत वरील संदर्भित पत्र क्र.३ नुसार शासकिय लेखापरिक्षक यांनी आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे.

| अनु. क्र. | प्रादेशीक विभागाची नावे | लेखाशिर्ष क्र. | नावे | जमा |
|---|---|---|---|---|
| १ | नागपुर | ७८९ | | ९,५७,५८९.०६ |
| २ | औरंगाबाद | ७९० | २,२३,७६,२५३.०२ | |
| ३ | नांदेड | ७९०-A | ९५,०१,०८१.०० | |
| ४ | पुणे | ७९१ | १,२२,३९,७५४.८९ | |
| ५ | मुंबई | ७९२ | | ६९,९६,४३४.२३ |
| ६ | नाशिक | ७९४ | | १,१४,७२,०७५.९८ |
| ७ | अमरावती | ७९५ | | २३,३६,७८७.३३ |

लेखा खाते परिपत्रक क्र. ६५८ दी.०७-०८-१९९५ नुसार CE Suspense लेखाशिर्षाची रक्कम दरमहा निरंक करण्याच्या सुचना आहेत. परंतु आपणांकडे वरील सुचनांचे काटकोरपणे पालन केले जात नाही. त्यामुळे सदर लेखाशिर्पाला रक्कम शिल्लक रहात आहे. सदरबाबत शासकिय लेखापरिक्षक यांनी आक्षेप घेतल्याबाबत आपणांस वरील संदर्भित पत्र क्र.१ व २ नुसार कळविण्यात आले होते. परंतु सदर आक्षेपावर आपणांकडून काहीही कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे सदर आक्षेप वार्षिक लेखे २०१६-१७ व वार्षिक लेखे २०१७-१८ मध्ये महामंडळच्या अंतिम लेखापरिक्षत अहवालामध्ये तसाच ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे आपणांस कळविण्यात येते की, शासकिय लेखापरिक्षक यांनी वार्षिक लेखे २०१८-१९ मध्ये वरील बाबीबाबत पुन्हा आक्षेप नोंदविण्यात

. त्यामुळे सदर शिल्लक रकमेबाबत गांर्भियाने लक्ष देण्यास संबंधीतांना सुचना देण्यात याव्यात व शिर्षचा ताळमेळ घालावा व लेखा खाते परिपत्रकानुसार सदर लेखाशिर्षाला रक्कम निरंक करण्याची करण्यात यावी. हि विनती

१६.११.१८

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे करित





महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८.